रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक २०३
www.ramprahar.com

शुक्रवार, ९ फेब्रुवारी २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## प्राथमिक शाळांची वेळ बदलणार; जीआर जारी



**मुंबई** : राज्यातील चौथीपर्यंतच्या शाळा सकाळी ९ वाजल्यानंतर भरवा, असा अध्यादेश (जीआर) महाराष्ट्र सरकारने काढला आहे. याबाबत राज्य सरकारने सर्व शाळांना सूचना दिल्या आहेत. अनेक प्राथमिक शाळा सकाळी ७ वाजता सुरू होतात. त्यामुळे विद्यार्थ्यांची झोप होत नाही. याचा परिणाम त्यांच्या स्वास्थ्यावर होतो. ते लक्षात घेता काही दिवसांपूर्वी राज्यपालांनी एका भाषणात मुलांच्या मानसिक स्वास्थ्यासाठी शाळेच्या वेळा बदलण्याच्या सूचना दिल्या होत्या. शिक्षणमंत्र्यांनी याबाबत विचार सुरू असल्याचे सांगितले होते. दरम्यान, सरकारने आता निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी राज्यात सुरू असलेल्या ६५ हजारांहून अधिक सरकारी शाळांमध्ये होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात सरकारी, अनुदानित, विनाअनुदानित आणि खासगी अशा एकूण १,१०,११४ शाळा आहेत.


**अंतरंग**

खोपटे येथे अपघातात एकाचा मृत्यू; दुसरा जखमी/३

खालापूर तालुक्यातून दोन अल्पवयीन मुलींचे पलायन/५

अंडर १९ वर्ल्डकप : ऑस्ट्रेलिया फायनलमध्ये/८


# राज्य सरकारचा गुगलसोबत करार

### कृषी, आरोग्यासह विविध क्षेत्रांत होणार एआयचा वापर




**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील कृषी, आरोग्यासह विविध क्षेत्रांत शाश्वत विकासासाठी कृत्रिम बुद्धीमत्ता (एआय) ॲप्स तसेच तंत्रज्ञानाच्या उपयोगाकरिता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत राज्य शासन आणि गुगल यांच्यात गुरुवारी (दि.८) एआय फॉर महाराष्ट्र सामंजस्य करार करण्यात आला. एआयच्या सहाय्याने कृषी व आरोग्य क्षेत्रात शाश्वत बदल होण्यासह सर्वसामान्य माणसाचे जीवनमान उंचावेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी व्यक्त केला.

**सात क्षेत्रांसाठी भागिदारी**

नाविन्यता आणि उद्योजकतेतील भागीदारीद्वारे गुगल राज्यातील स्टार्टअप इकोसिस्टीमला तसेच उद्योजकता विकासाला एआय तंत्रज्ञान पूरवून सहकार्य करणार आहे तसेच कौशल्य प्रशिक्षण आणि शिक्षण, आरोग्य, कृषी, पर्यावरण, नगर नियोजन, वाहतूक नियोजन अशा क्षेत्रांसाठी या कराराद्वारे गुगलचे सहकार्य लाभणार आहे. शासकीय सेवांमध्ये नाविन्यता आणून सामान्य माणसापर्यंत शासकीय योजना प्रभाविपणे पोहचविण्यासाठीदेखील तंत्रज्ञान उपलब्ध होणार आहे.

गुगल इंडियाच्या मुंढवा येथील कार्यालयात झालेल्या या करारावेळी राज्याचे मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी, गुगल इंडियाचे भारतातील प्रमुख आणि उपाध्यक्ष संजय गुप्ता, नागपूर येथील ट्रीपलआयटीचे संचालक प्रा.डॉ. ओमप्रकाश काकडे, क्सिस माय इंडियाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक प्रदीप गुप्ता उपस्थित होते.

आज संपूर्ण जग तंत्रज्ञानाने चालत असून तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रशासन चालविणे हा अतिशय सकारात्मक बदल आहे, असे सांगून उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्य शासन कायमच अशा अभिनव प्रयोगांना प्रोत्साहन देत आहे. गेल्या सहा महिन्यांत एआय तंत्रज्ञान वेगाने बदलले असल्याने त्याचा उपयोग करून घेण्यासाठी वेगाने पावले उचलणे गरजेचे असून त्या दृष्टीने कमी वेळात झालेला हा करार सकारात्मक दिशेने उचलेले पाऊल आहे. नव्या तंत्रज्ञानात लोकांचे जीवनमान बदलण्याची क्षमता असून अशा तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

गुगलसोबत नागपुरात एआयचे उत्कृष्टता केंद्र निर्माण करीत आहोत. त्याहीपुढे जाऊन विविध सात क्षेत्रांत शाश्वततेसाठी व्यापक भागीदारीचा हा करार गुगलसोबत करण्याचा निर्णय घेतला असून त्यामुळे पुणे हे एआयसंदर्भात जगाच्या नकाशावर येईल, असेही उपमुख्यमंत्री म्हणाले.

## माजी मंत्री बाबा सिद्दीकींचा अखेर काँग्रेसला राम राम!

**मुंबई : प्रतिनिधी**




महाराष्ट्राचे माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांनी काँग्रेसला रामराम केला आहे. त्यांनी ट्वीट करून पक्षाला रामराम केल्याची घोषणा केली. दरम्यान, बाबा सिद्दीकी हे उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करणार असल्याची चर्चा आहे.

सिद्दीकी यांनी ट्वीट करून म्हटले आहे की, मी तरुणपणी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. ४८ वर्षांचा हा एक महत्त्वाचा प्रवास आहे. आज मी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा तत्काळ प्रभावाने राजीनामा देत आहे. मला व्यक्त करायचे आहे असे बरेच काही आहे, परंतु या म्हणीप्रमाणे काही गोष्टी न सांगितल्या जातात. या प्रवासात सहभागी झालेल्या सर्वांचे मी आभार मानतो.

# काळा टिका लावल्याने प्रगतीला नजर लागत नाही

### काँग्रेसच्या 'ब्लॅक पेपर'वरून पंतप्रधान मोदींचा निशाणा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



काँग्रेसच्या ब्लॅक पेपरवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाष्य करीत काळा टिका लावल्यामुळे प्रगतीला नजर लागत नाही, असा टोला लगावला आहे. राज्यसभेतील ५६ खासदारांचा कार्यकाळ संपत असून त्यानिमित्ताने या खासदारांच्या आभार प्रदर्शनावर गुरुवारी (दि.८) राज्यसभेत चर्चा झाली. त्या वेळी पंतप्रधान मोदी बोलत होते.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी दिल्ली येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत काळी पत्रिका प्रसिद्ध केली. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी २०१४ पूर्वीच्या अर्थव्यवस्थेवर आणि गैरव्यवहारांवर श्वेतपत्रिका काढणार असल्याची घोषणा केल्यानंतर काँग्रेसने ही काळी पत्रिका काढण्याचा निर्णय घेतला. **(पान २ वर..)**

### लोकसभेत 'युपीए'ची श्वेतपत्रिका सादर

मोदी सरकारने लोकसभेत श्वेतपत्रिका सादर केली आहे. युपीए म्हणजेच तत्कालीन काँग्रेसप्रणित संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या काळातील आर्थिक गैरव्यवहाराविरोधात ही श्वेतपत्रिका अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केली. यामुळे काँग्रेससह सहकारी पक्षांच्या गोटात खळबळ उडाली आहे.

### गाव चलो अभियान



**पनवेल : भाजपच्या गाव चलो अभियान अंतर्गत पक्षाचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी गुरुवारी नेरे येथे बूथ कमिटीच्या पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले तसेच नागरिकांशी संवाद साधला. या वेळी भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील यांच्यासह सरपंच, उपसरपंच, सदस्य, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.** (छाया : योगेश पाटील)

## वडखळच्या लॉजवरील हत्या अनैतिक संबंधातून

### पोलिसांनी पाच तासांत आवळल्या आरोपींच्या मुसक्या

**अलिबाग : प्रतिनिधी**

पेणच्या वडखळ येथील लॉजवर व्यवस्थापकाची हत्या करून आरोपी पसार झाले होते, मात्र पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत पाच तासांमध्ये आरोपींना गजाआड केले आहे. ही हत्या अनैतिक संबंधातून झाल्याचे उघड झाले आहे.

वडखळ येथील सावली लॉजमध्ये बुधवारी पहाटे व्यवस्थापक धर्मेंद्र कुशवाह (वय ४०, रा. वडखळ नाका) याचा मृतदेह आढळून आला. अज्ञात मारेकऱ्यांनी धारदार शस्त्राने गळा व गुप्तांग कापून निर्घृण हत्या केली होती. या प्रकरणी वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. घटनेचे गांभिर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे आणि अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी सखोल आणि समांतर तपास सुरू करण्याचे निर्देश स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे, उपनिरीक्षक विशाल शिर्के यांनी पथकासह तपासाला सुरुवात केली.

सावली लॉज रूम नं.११५मध्ये ही हत्या करण्यात आली होती. त्यामुळे लॉजमध्ये आलेल्या आणि बाहेर गेलेल्या सर्वांचा शोध सुरू करण्यात आला. प्राथमिक तपासाच्या आधारे पोलिसांनी काही संशयित आरोपी निश्चित केले. त्यानंतर त्यांचे मोबाईल नंबर आणि लोकेशन प्राप्त केले, पण आरोपींनी मोबाईल फोन बंद केल्याचे दिसून आले. त्यामुळे पोलिसांनी खबऱ्यांमार्फत आरोपींचा शोध सुरू केला. तेव्हा हे संशयित आरोपी खासगी वाहनाने पेणकडे पळून गेल्याची माहिती प्राप्त झाली. **(पान २ वर..)**

## मुंबईमध्ये माजी नगरसेवकाचा गोळीबारात मृत्यू; हल्लेखोरानेही केली आत्महत्या

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील ठाकरे गटाचे माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकर यांचा गोळीबारानंतर उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. अभिषेक हे माजी आमदार विनोद घोसाळकर यांचे पुत्र आहेत. दरम्यान, हल्लेखोर मॉरिसभाईनेही स्वत:वर गोळ्या झाडून आत्महत्या केली.

मॉरिसभाई आणि अभिषेक घोसाळकर हे फेसबुक लाईव्ह करीत होते. फेसबुक लाईव्ह झाल्यानंतर मॉरिसभाईने अभिषेक घोसाळकरांवर अगदी जवळून गोळ्या झाडल्या. या गोळीबाराचा थरारक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. गोळीबारानंतर मॉरिसभाईनेही स्वत:वर चार गोळ्या झाडून आत्महत्या केल्याची माहिती समोर येत आहे.

## पोलादपूरमध्ये रेड्यांच्या झोंब्या; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील भोगाव खुर्द येथे रेड्यांच्या झोंब्यांचे बेकायदेशीररित्या आयोजन केल्याप्रकरणी पोलिसांनी दोन व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

भोगाव खुर्द येथे गुरुवारी (दि.८) सकाळच्या सुमारास संदीप शांताराम शेलार आणि अक्षय काशिराम कदम यांनी रेड्यांच्या झोंब्यांचे आयोजन करून जिल्हाधिकारी यांनी बजावलेल्या जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केले. या प्रकरणी भादंवि १८८ म्हणजेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) तसेच प्राण्यांना क्रूरतेने वागविणे प्रतिबंध अधिनियम १९६०च्या ११(१)(एन) अन्वये गुन्हा केला आहे. याबाबत हवालदार स्वप्नील कदम यांनी फिर्याद दिली. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## महाडमध्ये बालविवाहाचा प्रयत्न उधळला

**महाड : प्रतिनिधी**

अल्पवयीन प्रेमी जोडप्याच्या संबंधातून मुलगी पाच महिन्यांची गर्भवती राहिल्याने बेकायदेशीर लग्न लावण्याचा घाट महाड तालुक्यात दोन्ही कुटुंबांनी घातला होता. या प्रकरणी पतीसह मुलीचे आई-वडील, सासू-सासरे यांच्याविरोधात बालविवाह तसेच पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आली आहे.

महाड तालुक्यातील वाकी येथील अल्पवयीन मुलीचे आणि मुमुर्शी आदिवासीवाडीत राहणाऱ्या अल्पवयीन मुलाचे प्रेमसंबंध होते. त्यातून ती मुलगी पाच महिन्यांची गर्भवती राहिली. यामुळे दोन्ही कुटुंबांनी या दोघांचे बेकायदेशीररित्या लग्न लावून देण्याचा प्रयत्न केला, पण महाडच्या महिला समुपदेशन केंद्राकडून हा प्रकार हाणून पाडण्यात आला. याबाबत महाड तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.







# शिक्षण व्यवस्थेत अमूलाग्र बदल घडविण्यासाठी शासन प्रयत्नशील

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रतिपादन

**ठाणे : प्रतिनिधी**

शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडविण्यासाठी, सर्वांना उत्तम दर्जाचे शिक्षण देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी (दि.८) येथे केले.

विद्या प्रसारक संस्था आणि संकल्प सेवा मंडळ यांच्या डीएलबी डिग्री कॉलेजचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते.



या समारंभास शिक्षणमंत्री दीपक केसरकर, माजी महापौर नरेश मस्के, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, प्रांताधिकारी उर्मिला पाटील, विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष देवराम भोईर आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, आजच्या स्पर्धेच्या युगात प्रत्येकाला चांगले शिक्षण मिळणे ही काळाची गरज आहे. शासन त्या दृष्टीने प्रयत्नशील आहे. ठाण्यात अनेक विकास प्रकल्प सुरू आहेत. येत्या काळात ठाण्याचा सर्वांगीण विकास होणारच. विकासाबरोबरच पर्यावरण रक्षणही होईल याकडेही कटाक्षाने लक्ष दिले जात आहे. विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष देवराम भोईर यांनी शिक्षण क्षेत्रातील १९७२ साली पाहिलेले केजी टू पीजी हे स्वप्न पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न निश्चित सफल होईल.

या शिक्षण संकुलामध्ये स्मार्ट क्लासरूम, कॉम्प्युटर लॅब, ठाण्यातील सर्वांत मोठे ग्रंथालय, कॉलेज प्लेसमेंट व करियर गाईडन्स सेंटर त्याचबरोबर विधी महाविद्यालय, मास मीडिया व कम्युनिकेशन महाविद्यालय अशी विविध महाविद्यालये सुरु होत आहेत. गरजूंना शिक्षण देण्याचे पुण्य काम या संस्थेतून होत आहे, असेच चांगले काम करीत राहा, शासन आपल्या पाठीशी निश्चित उभे आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सुप्रसिद्ध आरजे अमित काकडे यांनी केले, तर विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष देवराम भोईर यांनी सर्व मान्यवरांचे आभार मानले.

# घरेलू कामगारांच्या नोंदणी शुल्कात कपात

## भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांच्या पाठपुराव्याला यश

**मुंबई : प्रतिनिधी**



भाजप प्रदेश कामगार मोर्चाने केलेली मागणी मान्य करीत राज्य सरकारने घरेलू कामगार नोंदणी शुल्कात कपात करण्याचा निर्णय नुकताच घेतला आहे. हा निर्णय घेतल्याबद्दल भाजप कामगार मोर्चाने राज्य सरकारचे व या मागणीचा सरकार दरबारी पाठपुरावा करणाऱ्या भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानले आहेत.

घरेलू कामगारांच्या कल्याणासाठी राबवण्यात येणाऱ्या योजनांच्या लाभार्थ्यांच्या नोंदणी शुल्कात व अंशदान रकमेत घसघशीत कपात करण्याचा निर्णय शासनाने ५ फेब्रुवारी रोजी घेतला आहे. कामगार मोर्चाच्या मागण्यांबाबत काही महिन्यांपूर्वी भाजप प्रदेश मुख्यालयात बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली कामगार मंत्री सुरेश खाडे, भाजप प्रदेश सरचिटणीस संजय केणेकर, विक्रांत पाटील, मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे यांच्या उपस्थितीत बैठक झाली होती. या बैठकीत कामगार मोर्चाच्या वतीने घरेलू कामगार नोंदणी शुल्कात कपात करावी, अशी मागणी करण्यात आली होती.

घरेलू कामगारांचे नोंदणी शुल्क, अंशदान रकमेत कपात करणे तसेच दारिद्र्य रेषेखालील ज्येष्ठ नागरिकांना वयपरत्वे येणाऱ्या शारीरिक अक्षमतेनुसार त्यांना सहाय्यभूत उपकरणांची असलेली गरज लक्षात घेऊन मुख्यमंत्री वयोश्री योजना राबवण्यात यावी, अशा मागण्या कामगार मोर्चातर्फे करण्यात आल्या होत्या. भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी कामगार मोर्चाच्या या मागण्यांचा प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. या पाठपुराव्याला यश येऊन राज्य सरकारने याबाबतचा शासन निर्णय जारी केला. या निर्णयांचा लाभ हजारो ज्येष्ठ नागरिक व घरेलू कामगारांना होणार आहे, असे कामगार मोर्चातर्फे प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

या दोन शासन निर्णयाद्वारे घरेलू कामगारांना शासनाच्या कल्याणकारी योजनांचे लाभार्थी म्हणून नोंदणी करण्यासाठीच्या मासिक शुल्कात ३० रुपयांवरून एक रुपये इतकी घसघशीत कपात करण्यात आली. नोंदणीकृत लाभार्थ्यांच्या अंशदान रकमेत मासिक पाच रुपयांवरून एक रुपये इतकी कपात करण्यात आली आहे.

### गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना

# कृषी विभागातर्फे ४८.६३ कोटी रुपये वितरित

**मुंबई : प्रतिनिधी**

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत कृषी विभागाने २४५३ दावे निकाली काढले असून त्यापोटी ४८ कोटी ६३ लाख रुपये वितरित करण्यास मान्यता दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

राज्यातील शेतकऱ्यांना अपघातात अपंगत्व अथवा मृत्यू आल्यास त्यांना भरपाई देण्यासाठी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना लागू करण्यात आली आहे. राज्यात ७ एप्रिल ते २२ ऑगस्ट २०२२ या १३८ दिवसांच्या खंडित कालावधीतील ७७ (७३ मृत्यू व ४ अपंगत्व) पात्र दाव्यांपोटी एक कोटी ५१ लाख रुपयाचा विमा वितरित करण्यात येणार आहे .

राज्यात २३ ऑगस्ट २०२२ ते १८ एप्रिल २०२३ या कालावधीतील २३९ दिवसांच्या खंडित कालावधीतील पहिल्या टप्प्यातील २३९ (२३७ मृत्यू व दोन अपंगत्व) पात्र दाव्यांपोटी चार कोटी ७६ लाख रुपये व दुसऱ्या टप्प्यातील २१३७ (२०९४ मृत्यू व ४३ अपंगत्व) पात्र दाव्यांपोटी ४२ कोटी ३६ लाख रुपये अशा प्रकारे पहिल्या व दुसऱ्या टप्प्यातील पात्र दाव्यांच्या अनुषंगाने अपघातग्रस्त शेतकरी/वारसदारांना आर्थिक मदतीची ४७ कोटी १२ लाख रुपये वितरित करण्यात येणार आहे.

अशा प्रकारे राज्यात ७ एप्रिल ते २२ ऑगस्ट २०२२ आणि २३ ऑगस्ट २०२२ ते १८ एप्रिल २०२३ या कालावधीतील एकूण २४५३ दावे निकाली काढण्यात आले आहेत. त्यापोटी ४८ कोटी ६३ लाख रुपये वितरित करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

# कर्जत शहरात विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषद हद्दीतील विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांच्या अध्यक्षतेखाली व नगरसेवक संकेत भासे यांच्या हस्ते पार पडले.



या वेळी नगरसेवक राहुल डाळिंबकर, बळवंत घुमरे, प्राची डेरवणकर, सुवर्णा निलधे, पुष्पा दगडे, वैशाली मोरे, शहरप्रमुख अभिषेक सुर्वे, नदीम खान, दिनेश कडू, सचिन भोईर, हर्षल मोरे, विशाल बैलमारे, नितीन शिंदे, हर्षद जाधव, सौरभ केदारी आदी उपस्थित होते.

नगर परिषद हद्दीतील एचपी पेट्रोल पंप वाडी ते विशाल बैलमारे यांच्या घरापर्यंत रस्ता व गटारे तयार करणे २५ लाख, साईनगर येथे पाण्याची टाकी बांधणे ४५ लाख, दहिवली येथील नाला खोलीकरण २० लाख, बामचा मळा येथे गणेश घाट बांधणे १० लाख, प्रभाग क्र. ४मधील इंदिरानगर येथील मिस्ट बिल्डींग गेट ते साई मंदिर नाल्यापर्यंत गटार व स्लॅब बनविणे २० लाख, दहिवली येथील कोकण आळी ते राकेश कडू यांच्या घरापर्यंत रस्ता व गटार तयार करणे ५० लाख, दहिवलीलगत उल्हास नदी काठी घाट सुशोभीकरण करणे १. ५ कोटी, गुरव आळी येथील अंतर्गत रस्ता तयार करणे १० लाख या विकासकामांचा समावेश आहे.

# पेणमधील २५ किमीच्या रस्त्यांना प्रमुख जिल्हामार्ग म्हणून मंजुरी

## ■ आमदार रविशेठ पाटील यांच्या प्रयत्नाला यश

**पेण : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या बांधकाम विभाामार्फत पेण तालुक्यातील तरणखोप ते रामराज, दवणसर, बेलवडे, मुंगोशी, दर्गावाडी, बळवली ते चुनाभट्टी असा १३.५ किमीचा मार्ग तसेच सापोलीमार्गे तळवली हेटवणे नवीन वसाहत सातेरीवाडी भोरमाळ ते महलमिऱ्या डोंगर चांदेपट्टी ते पाचगणी असा १२ किमीच्या रस्त्याला जिल्हामार्ग म्हणून मंजुरी मिळाली आहे.

यासाठी आमदार रवीशेठ पाटील, भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष माजी आमदार धैर्यशील पाटील, जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, माजी सभापती नीलिमा पाटील यांच्या प्रयत्नामुळे या रस्त्यांना प्रमुख जिल्हामार्ग म्हणून मान्यता मिळाली आहे.

सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग मुख्य अभियंता यांनी सुधागड (पाली) व पेण तालुक्यातील मार्ग प्रमुख जिल्हामार्ग म्हणून दर्जोन्नत करणेबाबत प्रस्ताव सादर केला होता. या मागणी पत्रात या रस्त्यांवरील वाहतूक, गावांची संख्या, लोकसंख्या, रस्त्याचा होणारा वापर तसेच रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांचा ठराव विचारात घेता हे रस्ते प्रमुख जिल्हा मार्ग म्हणून दर्जान्नत करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. यानुसार पेण तालुक्यातील तरणखोप ते मुंगोशीमार्गे चुनाभट्टी असा १३.५ किमीचा व सापोली ते महलमिऱ्या पाचगणी असा १२ किमीचा मार्ग असा एकूण २५ किमीचा मार्ग प्रमुख जिल्हामार्ग म्हणून दर्जान्नत करण्यात आला आहे.

रावे, कासारभट, वरवणे, तिलोरे, वाशी, काळेश्री हमरापुर दादर व निगडे, पाबळ, कोंडवे, सावरोली खारपाडा केंद्र सरकारकडून सीआरएफ फंड राज्य सरकारकडून बजेटमधून दरवर्षी निधी मंजूर केला जाऊ शकतो. त्यामुळे इथले रस्ते चकाचक होतील, अशी माहिती जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी दिली.

# ‘त्या’ प्रवाशाचा अखेर मृत्यू

**नवी मुंबई** : वाशी रेल्वेस्थानकात रूळ ओलांडताना गाडीखाली आलेल्या प्रवाशाचा अखेर मृत्यू झाला आहे. प्लॅटफॉर्मवरील सर्व प्रवाशांनी डबा वर उचलून त्याला गाडीखालून काढले होते, पण जखमी प्रवाशाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. राजेंद्र खाडके असे या मृत प्रवाशाचे नाव आहे.

राजेंद्र खाडके हे वाशी रेल्वेस्थानकात रूळ ओलांडताना गाडीखाली आले होते. त्यांना वाचवण्यासाठी प्लॅटफॉर्मवरच्या आणि गाडीतील प्रवाशांनी एकत्र येत सर्वशक्तिनिशी गाडीचा डबा हलवला. खाडके यांना डब्याखालून बाहेर काढण्यात यश आले, मात्र खाडके गंभीर जखमी झाले होते. त्यांना रुग्णालयात नेण्यात आले, पण उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे.

# भाजप खालापूर मंडळातील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

**खालापूर : प्रतिनिधी**

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भाजपतर्फे जोरदार तयारी सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार बुधवारी (दि.७) उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी आमदार सुरेश लाड यांच्या प्रमुख उपस्थितीत खालापूर मंडळातील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या.




युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्षपदी अमर मानकवले, माथाडी कामगार तालुकाध्यक्षपदी दत्तात्रय पुरी, तालुका उपाध्यक्षपदी अनिल जाधव, ओबीसी सेल तालुका उपाध्यक्षपदी दिनेश जंगम, साजगाव जि.प. सरचिटणीसपदी नामदेव सकपाळ, कलोते पं. स. विभाग अध्यक्षपदी लव्हेश कर्नूक, सावरोली पं.स. विभाग अध्यक्षपदी ज्ञानेश्वर पारंगे, जिल्हा वॉरिअर सहसंयोजकपदी अभि कदम, युवा वॉरिअर तालुका संयोजकपदी अक्षय जाधव, सहसंयोजकपदी तेजस घारे, युवा मोर्चा तालुका कार्यकारिणी सदस्यपदी केतन महाडिक तर सारसन बूथ अध्यक्षपदी राजेश पाटील यांची निवड करण्यात आली.

या वेळी कर्जत खालापूर विधानसभा निवडणूक प्रमुख किरण ठाकरे, माजी जि. प. सभापती नरेश पाटील, जिल्हा सरचिटणीस दिपक बेहरे, रायगड जिल्हा मन की बात संयोजक प्रल्हाद केणी, जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल मोरे, जिल्हा उपाध्यक्ष सनी यादव, खालापूर मंडळ अध्यक्ष भाजप प्रवीण मोरे, युवा मोर्चा खालापूर तालुकाध्यक्ष नागेश पाटील, संदीप पाटील, मावळ लोकसभा समन्वयक महिला मोर्चा मृणाल खेडकर, जिल्हा उपाध्यक्ष वीनिता घुमरे, सरचिटणीस निकिता हेलंडे, महिला तालुकाध्यक्ष सुजाता दळवी, कर्जत तालुका उपाध्यक्ष सरस्वती चौधरी, माजी उपसरपंच तथा विद्यमान ग्रामपंचायत सदस्य श्वेता मनवे, कर्जत–खालापूर विधानसभा युवा मोर्चा संयोजक प्रसाद पाटील, आध्यात्मिक आघाडी जिल्हा संयोजक काशिनाथ पारठे, खालापूर तालुका उपाध्यक्ष आबा देशमुख, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष जगदीश आगीवले, तालुका उपाध्यक्ष प्रसाद देशमुख, खालापूर शहराध्यक्ष दीपक जगताप, विकास रसाळ, जयेंद्र पाटील, प्रवीण मनवे, सुनील सुखदरे, कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

पान १ वरुन

## काळा टिका लावल्याने प्रगतीला नजर लागत नाही

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी राज्यसभेत भाषण करीत असताना या काळ्या पत्रिकेची खिल्ली उडविली. आपल्याकडे लहान मुलाला नजर लागू नये म्हणून कुटुंबातून एक छोटासा काळा टिका लावला जातो. मागच्या १० वर्षांत भारत प्रगतीच्या शिखरावर आहे. या प्रगतीला कुणाची नजर लागू नये म्हणून काळा टिका लावण्याचा प्रयत्न झाला. त्यासाठी मी खरगे यांचे आभार व्यक्त करतो, कारण आमच्या प्रगतीसाठी त्यांनी काळा टिका लावला. त्याबद्दल मी त्यांचे स्वागत करतो. एका बुजूर्ग व्यक्तीने हे काम केले, त्याचा अधिक आनंद होत आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

राज्यसभेतील ज्या ५६ खासदारांचा कार्यकाळ संपतोय त्यामध्ये माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचाही समावेश आहे. चर्चेमध्ये आभारप्रदर्शन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी डॉ. सिंग यांचे कौतुक केले. ते म्हणाले, जेव्हा खासदारांच्या योगदानाचा उल्लेख येईल, तेव्हा डॉ. मनमोहन सिंग यांची चर्चा नक्कीच होईल. त्यांनी सभागृहाला अनेकदा मार्गदर्शन केले. ते एकदा व्हीलचेअरवर आले आणि त्यांनी मतदान केले. लोकशाहीला बळ देण्यासाठी ते आले होते. त्यांनी आम्हाला मार्गदर्शन करीत राहावे.

## वडखळच्या लॉजवरील हत्या अनैतिक संबंधातून

या माहितीनंतर पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या आणखी तीन अधिकाऱ्यांना तपासासाठी बोलावून घेतले आणि पेणकडून पनवेलकडे जाणाऱ्या महामार्गावर वाहनांची तपासणी सुरू केली, पण याची कुणकुण लागल्याने आरोपींनी खासगी गाडी सोडून एसटी महामंडळाच्या बसने पनवेलकडे प्रवास सुरू केला. तरीही पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवून आरोपींना गाठलेच. बस अडवून त्यांनी तीन आरोपींना ताब्यात घेतले. सुरुवातीला आरोपींनी उडवाउडवीची उत्तरे दिली, पण पोलिसी हिसका दाखवताच त्यांनी गुन्हा कबूल केला तसेच गुन्हा केल्यानंतर उत्तर प्रदेश व झारखंड येथे पळून जाणार होतो असे सांगितले.

अटक करण्यात आलेल्या तिघांमध्ये एका महिलेचा समावेश आहे. या महिलेचे आरोपीपैकी एकाशी प्रेमसंबंध होते. तर मयत धर्मेंद्रशीही अनैतिक संबंध होते. यातून आरोपी आणि मृत धर्मेंद्र यांच्यात भांडणही झाले. यानंतर धर्मेंद्रचा काटा काढण्याचा निर्णय महिला व तिच्या प्रियकराने घेतला. महिलेने धर्मेंद्रला शरीरसंबंधाचे आमिष दाखवले. धर्मेंद्र आणि महिला लॉजमधील रूमवर पोहचताच महिलेचा प्रियकर आणि त्याचा साथीदारही रूमवर आले. तिघांनी धर्मेंद्रचे तोंड दाबून त्याचा गळा कापला. नंतर लिंग कापले आणि ते त्याच्या डोळ्यावर ठेवल्याची धक्कादायक बाब पोलीस तपासात समोर आली.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे, स्थानिक गुन्हे शाखेतील सहाय्यक निरीक्षक संदीप पोमण, उपनिरीक्षक धनाजी साठे, विकास चव्हाण, विशाल शिर्के, हवालदार अमोल हंबीर, प्रतिक सावंत, नाईक सचिन वावेकर, शिपाई ईश्वर लांबोटे तसेच सायबर पोलीस ठाण्यातील शिपाई तुषार घरत, अक्षय पाटील यांनी गुन्ह्याच्या तपासात महत्त्वाची भूमिका बजावली.

# संजिवनी स्कूलमध्ये प्रश्नमंजूषा, व्याख्यान

### पर्यावरण सेवा योजनेंतर्गत पनवेल मनपाचा उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत पर्यावरण संवर्धन व संरक्षण याचे महत्त्व शालेय स्तरावर बालवयात विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष कृतीद्वारे बिंबवण्यासाठी शासन निर्णयाद्वारे राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये पर्यावरण सेवा योजना पनवेल महापालिकेच्या वतीने राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी (दि. ८) संजिवनी स्कूल खारघर येथे महापालिकेच्या वतीने पर्यावरण विषयक प्रश्नमंजूषा स्पर्धा व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.



माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत पर्यावरणाचे महत्त्व शालेय विद्यार्थ्यांना समजावे यासाठी पर्यावरण सेवा योजना महापालिकेच्या वतीने पालिका कार्यक्षेत्रातील २५ माध्यमिक विद्यालयांमध्ये राबविण्यात येत आहे. या पर्यावरण सेवा योजनांतर्गत आकाश, जल, वायू, भूमी, अग्नि या माझी वसुंधरा अभियानातील महत्त्वाच्या घटकांनुसार कृती कार्यक्रम, शिबिरे, व्याख्याने, वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, वृक्षारोपण, प्रश्नमंजुषाचे आयोजन विद्यालयांमध्ये करण्यात येत आहे.

पर्यावरणसेवा योजनेंतर्गत संजिवनी विद्यालयामध्ये या योजनेची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांनी झाडे दत्तक घेऊन त्यांना वाढविण्याविषयी सांगण्यात आले, तसेच ‘पर्यावरणाचे महत्त्व’ या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते, तसेच माझी वसुंधरा अंतर्गत ‘आकाश’ विषयाशी संबंधित इ. सहावी, सातवी, आठवी यांची प्रश्नमंजूषा स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना महापालिका पर्यावरण विभाग प्रमुख मनोज चव्हाण यांच्या हस्ते बक्षीस वितरीत करण्यात आले. याबरोबरच पर्यावरण संवर्धनावर आधारित व्हिडीओ विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले.

या वेळी विद्यालयाचे प्राचार्य अनुराग पांडे, पर्यावरण सेवा योजना समन्वयक अतुल फडके, कार्यक्रम अधिकारी सुवर्णा मोरे, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याच पद्धतीने महापालिकेच्या वतीने विविध शाळांमध्ये कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

# तळोजा औद्योगिक वसाहत विस्तारणार

## ४८३ कोटी रुपयांच्या निधीतून होणार विकासकामे

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा औद्योगिक वसाहतीचा विस्तार चिंध्रण, म्हाळुंगी आणि कानपोली या गावांच्या जमिनींवर केला जाणार असून मागील दोन वर्षांपूर्वी राज्य सरकारने या नव्या औद्योगिक वसाहतीसाठी भूसंपादन केले. त्यानंतर या औद्योगिक वसाहतीचे काम कधी सुरू होणार याकडे उद्योजकांचे लक्ष लागले होते.



जानेवारीत याबाबतची निविदा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) प्रसिद्ध केली होती, मात्र या निविदेतील तांत्रिक अडचणींमुळे पुन्हा मंगळवारी याबाबतची शुद्धीकरणासहीत फेरनिविदा प्रसिद्ध करण्यात आली. नव्या निविदेनुसार एमआयडीसी या वसाहतीच्या निर्माणासाठी ४८३ कोटी रुपये पहिल्या टप्प्यात खर्च करणार आहे.

राज्य सरकारचे उद्योगस्नेही धोरण आहे. औद्योगिक वसाहतींना जमीन कमी पडू लागल्याने सरकारने पुढाकार घेऊन तळोजा औद्योगिक वसाहतीचा विस्तार करण्यासाठी नियोजन केले. नव्या विस्तारीत एमआयडीसीसाठी चिंध्रण, कानपोली आणि म्हाळुंगी या गावांची निवड करून या गावांचे भूसंपादन करण्यात आले. तब्बल २५७ हेक्टर जमिनीवर नवी औद्योगिक वसाहत वसली जाणार आहे. या नव्या वसाहतीमध्ये चिंध्रण, कानपोली आणि म्हाळुंगी गावातील प्रकल्पग्रस्तांना वाणिज्य वापरासाठी भूखंड मिळणार आहेत. तसेच रोजगार या परिसरात मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणार आहे.

या नव्या एमआयडीसीमध्ये रासायनिक कारखाने आणि माहिती तंत्रज्ञाचे उद्याोग उभे राहणार आहेत. राज्य सरकारचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी जुन्या औद्योगिक वसाहतीच्या निर्माणामध्ये ज्या चुका प्रशासनाकडून झाल्या त्यांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी प्रशस्त रस्ते, वाहनतळ, कामगार रुग्णालय, अग्निशमन दलाचे केंद्र आणि वाहनतळासाठी विशेष जागेचे नियोजन करण्याच्या सूचना एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

उद्योगमंत्र्यांच्या सूचनेनंतर नवी औद्योगिक वसाहतीच्या निर्माणाला वेग आला आहे. मंगळवारी वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या ४८३ कोटी ४० लाख रुपयांच्या निविदेमध्ये स्थापत्य, विद्युत आणि यांत्रिकी कामाचे वर्गीकरण करण्यात आले आहे.

**ही होणार पायाभूत कामे**

**नव्या औद्योगिक वसाहतीमधील चार पदरी पोहच रस्ता बांधणे, अंतर्गत रस्ते बांधणे, पाणी पुरवठ्यासाठी मुख्य जलवाहिनी आणि जलवितरणासाठी अंतर्गत जलवाहिन्या भूमिगत करणे, सांडपाणी संकलन वाहिनी टाकणे, कासाडी नदीवरील पूल बांधणे, सामाईक सुविधा केंद्र बांधणे, पथदिवे उभारणे, अग्निशमन केंद्र बांधणे, वाहनतळ आणि इतर सुविधा, विद्युत पायाभूत सुविधा पुरवण्यासोबत, उच्चदाब आणि लहान उद्योगांसाठी वीजवाहिनी भूमिगत करणे, विज उपकेंद्रासोबत, जलवितरणासाठी मोटारपंप केंद्र उभारून कार्यान्वित करणे.**

# खोपटे येथे एनएमएमटीची दुचाकींसह टेम्पोला धडक





**एकाचा मृत्यू; दुसरा जखमी**

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर, बातमीदार**

भरधाव वेगातील एनएमएमटी बसने कोप्रोली-नवघर रस्त्यावर खोपटे गावाजवळ प्रवास करणाऱ्या दोन मोटरसायकल स्वारांसह टेम्पोला धडक दिल्याने झालेल्या अपघातात मोटरसायकलस्वार निलेश शशिकांत म्हात्रे (वय २८) याचा नवी मुंबई येथील रुग्णालयात उपचारासाठी घेऊन जात असताना रस्त्यातच दुर्दैवी मृत्यू झाला आहे, तर खोपटे येथील चायनीज दुकानदार केशव आत्माराम ठाकूर (वय ५२) हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना नातेवाईकांच्या मदतीने कोप्रोली येथील सिद्धिविनायक हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

निष्पाप तरुणाचा अपघात मृत्यू झाल्याने खोपटा गाव परिसरातील संतप्त नागरिकांनी रास्ता रोको करून भरधाव वेगातील वाहनांना आवरण्याची मागणी केली. खोपटा, कोप्रोली व चिरनेर वशेणी, केळवणे, आवरे या मार्गांवरील प्रवाशी नागरीकांच्या रस्त्यावर अवजड वाहनांची रेलचेल असल्याने रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. त्यामुळे रस्त्यावर वारंवार अपघात होण्याची संख्या बळावली आहे. यात रस्त्यावरील उकडलेल्या साईट पट्यांचा तसेच खडबडीत रस्त्याचा अंदाज एनएमएमटी बसचालकाला न आल्याने भरधाव वेगातील एनएमएमटी बसने खोपटा-कोप्रोली रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या दोन मोटरसायकल स्वारांना व टेम्पोला जोरदार धडक दिल्याची दुर्घटना गुरुवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास घडली. या झालेल्या अपघात पाच मोटरसायकल स्वार थोडक्यात बचावले असले तर दोन मोटरसायकल स्वारांना फरफटत नेल्याने झालेल्या अपघात निलेश म्हात्रे याचा मृत्यू झाला असून केशव ठाकूर हे जखमी झाले असून त्यांच्या पायाच्या गुडघ्याला मार लागला आहे. त्यांची प्रकृती स्थिर आहे.

एनएमएमटी बसमधील प्रवाशी नागरिकांना किरकोळ दुखापत झाली. या अपघाताची माहिती मिळताच उरण पोलिसांचे पथक उरण वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक संजय पवार यांनी रस्त्यावरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले.

# तळोजात १४ मेट्रिक टन अमली पदार्थाची विल्हेवाट



**पनवेल : वार्ताहर**

तळोजा येथील मुंबई वेस्ट मॅनेजमेंटच्या अत्याधुनिक केंद्रात मुंबईच्या सीमा शुल्क विभागाने सुमारे १४ मेट्रिक टन अंमली पदार्थांची शास्त्रोक्त पद्धतीने जाळून विल्हेवाट लावली.

अंमली पदार्थ प्रतिबंधक आयुक्तालय, मुंबई सीमाशुल्क विभाग - ३च्या मुख्य आयुक्त प्राची स्वरुप, आयुक्त अतुल पांडा आणि इतर अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हे अंमलीपदार्थ तळोजा येथील मुंबई वेस्ट मॅनेजमेंटच्या प्रक्रिया केंद्रात शास्त्रोक्त पद्धतीने जाळून नष्ट केलयाचे सीमा शुल्क विभागाने स्पष्ट केले आहे. विल्हेवाट लावलेल्या लावलेल्या अमंलीपदार्थांची किंमत कोट्यवधींच्या घरात असल्याचे समजते. तळोजातील या सेंटरमध्ये यापूर्वी मुंबई पोलिस, नारकोटिक्स ब्युरो यांनी पकडलेल्या कोट्यवधींच्या अंमलीपदार्थांची विल्हेवाट लावण्यात आली आहे.

# चार्जिंगला लावलेला मोबाईल चोरीस

**पनवेल :** चार्जिंगला लावलेल्या मोबाईलची चोरी केल्याप्रकरणी अज्ञात आरोपीविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रवी गरड हे नवनाथ नगर, झोपडपट्टी पनवेल रेल्वे स्टेशन, मालधक्का रोड येथे राहतात. ते त्यांच्या लहान मुलासह घराशेजारी बांधलेल्या पत्र्याच्या खोलीमध्ये झोपले होते. त्यानंतर ते घरातून बाहेर पडले. घरातून बाहेर पडताना पत्रा खोलीचा दरवाजा लावलेला दिसून आला. या वेळी त्यांच्या मुलाने फोनवरून माहिती दिली की सोफ्यावर चार्जिंगला लावलेला मोबाईल दिसून येत नाही. त्यांनी आजूबाजूला शोधण्याचा प्रयत्न केला, मात्र मोबाईल सापडला नाही. त्यामुळे अज्ञाताने मोबाइल चोरून नेल्याप्रकरणी गरड यांनी तक्रार दाखल केली आहे.

# पनवेल महापालिकेची शिवजयंती नियोजन बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्ताने १९ फेब्रुवारी रोजी लोकसहभागातून महापालिकेच्या सहकार्यातून पनवेल शहरात भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात येणार आहे. या नियोजनाची बैठक आयुक्त तथा प्रशासक गणेश देशमुख यांच्या सूचनेनुसार गुरुवारी (दि. ८) ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात झाली.



या बैठकीस माजी सभागृह नेते परेश ठाकूर, सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत, महापालिका उपायुक्त गणेश शेटे, कैलास गावडे, डॉ. वैभव विधाते, वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, निरीक्षक रमेश जाधव, वाहतूक निरीक्षक संजय पाटील, माजी नगरसेवक, नगरसेविका, महापालिकेचे अधिकारी, विविध जयंती मंडळांचे, शाळांचे, शासकीय संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या वर्षी महापालिकेच्या माध्यमातून लोकसहभागातून छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्ताने भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. याचे नियोजन या बैठकीत करण्यात आले. या वेळी लेझीम पथक, चित्ररथ, ढोल पथक, चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा यांची स्पर्धा होणार आहे. या मिरवणुकीमध्ये विविध शाळांनी, संस्थांनी सहभागी होण्याचे आवाहन महापालिकेने केले असून आपल्या सहभागाची पूर्व नोंदणी महापालिकेकडे करणे गरजेचे असल्याचे उपायुक्त कैलास गावडे यांनी या वेळी सांगितले.

सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांनी शिवजयंतीच्या भव्य मिरवणुकीस सर्व नागरिकांनी शांततामय वातावरणात सहकार्य करावे, असे आवाहन केले, तर माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी स्वच्छता, सुरक्षा व विद्युत विभागास या दिवशी व्यवस्था ठेवण्याबाबत सूचित केले.

१९ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मिरवणुकीस सुरुवात होईल. हुतात्मा स्मारक चौक, आदर्श लॉज, गावदेवी मंदिर, सावरकर चौक, मनपा मुख्यालय, सेवा योजन कार्यालय, मौलाना आझाद चौकमार्गे मिरवणुकीचा शेवट टपाल नाक्यावरील शिवरायांच्या अर्धाकृती पुतळा चौकामध्ये होईल. या ठिकाणी मिरवणुकीत सहभागी स्पर्धकांमधून विजेत्या स्पर्धकांची नावे घोषित करून त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे.

शिवजयंती उत्सवाचा खर्च लोकसहभागातून व प्रायोजकांमार्फत केला जाणार आहे. नागरिकांनी वर्गणी देण्यासाठी महापालिकेशी संपर्क साधावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले.





**पनवेल : अटल सेतू हायवे (शेलघर) येथे भाजप उलवे नोड उपाध्यक्ष विनय घरत यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली चहा व पाण्याचा स्टॉल सुरू केला आहे. या स्टॉलचे उद्घाटन गुरुवारी माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत व अरुण घरत यांच्या हस्ते झाले. या वेळी आशा घरत, सपना घरत आदी उपस्थित होते.**

# सीकेटी विद्यालय मराठी माध्यमिक विभागात शालेय व आंतरशालेय स्पर्धा



**▮ स्पर्धेचे विजेते**

*प्रथम क्रमांक ज्येष्ठा प्रशांत पाटील (संत गोरा कुंभार) (भागूबाई चांगू ठाकूर, द्रोणागिरी), द्वितीय क्रमांक संस्कृत दिलीप रोहेकर (बाजी प्रभू देशपांडे) (चांगू काना ठाकूर-इंग्रजी माध्यमिक विद्यालय, नवीन पनवेल), तृतीय क्रमांक रोशनी हरेश नागोठकर (जिजामाता) (चांगू काना ठाकूर-मराठी माध्यम, माध्यमिक विद्यालय, नवीन पनवेल)*

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वर्गीय जनार्दन आत्माराम भगत यांच्या ९६व्या जयंतीनिमित्त जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी माध्यमिक विद्यालयात, शालेय व आंतरशालेय विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. आजच्या स्पर्धेच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या अर्चना ठाकूर ह्या उपस्थित होत्या.

या वेळी शालेय स्पर्धामध्ये पाचवी ते सातवी या गटासाठी एकपात्री अभिनय स्पर्धा घेण्यात आली. बुधवारी (दि. ७) घेण्यात आलेल्या स्पर्धेतील विजेत्यांना रोख रक्कम, पारितोषिके, सन्मान चिन्हे व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. आंतरशालेय स्पर्धांचे आयोजन ही करण्यात आले होते. यामध्ये इयत्ता पाचवी ते सातवीच्या गटासाठी या स्पर्धेमध्ये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या इतर शाखांबरोबरच परिसरातील अन्य शाळा ही सहभागी झाल्या होत्या. त्या विद्यार्थ्यांनीही या स्पर्धेत यश प्राप्त केले.

स्पर्धेचे परीक्षक प्रतिकेश मोरे व निखिल गोरे (ॲक्टर व डायरेक्टर) यांनी परीक्षण कामकाज पाहिले. पारितोषिक वितरण पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार यांच्या उपस्थित झाले. आजच्या कार्यक्रमासाठी चांगू काना ठाकूर विद्या संकुलातील सर्व मुख्याध्यापक व सर्व विभाग प्रमुख यांची उपस्थिती होती.

या विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस.टी. गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी मुख्याध्यापक कैलास सत्रे, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील शिक्षकवृंद व शिक्षकेतर सेवकांनी विशेष सहकार्य व मेहनत घेतली.

# अटल सेतूमार्गे मुंबई-उरण बेस्ट बस सुरू करा

**परिक्षीत ठाकूर यांची मागणी**

**उरण : रामप्रहर वृत्त**

अटल सेतू शिवडी-न्हावाशेवा सी लिंक नवीन पुलावरून प्रवास करण्यास स्थानिकांच्या सोयीकरिता मुंबई-उरण व उरण ते मुंबईपर्यंत बेस्ट बससेवा सुरू करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे उरण तालुका अध्यक्ष परिक्षीत ठाकूर यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांना निवेदन दिले आहे.

परिक्षीत ठाकूर यांनी निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनाने अटल सेतू न्हावा-शिवडी समुद्र मार्गे बांधलेल्या नवीन पूल नवी मुंबईच्या एक टोक असलेल्या उरणच्या पूर्व भागात जोडले. या पूलामुळे उरणहून मुंबईकडे येणाऱ्या स्थानिकांना प्रवासाचे अंतर दोन ते तीन तासांचे अंतर १५ ते २० मिनिटांत मुंबईकडे पोहचवित आहे. अशा सिलिंक पूलाची निर्मिती करून महाराष्ट्र शासनाने देशात पहिला असा समुद्रमार्गे पुलाची यशस्वी उभारणी केली आणि वहातुकीस खुला करण्यात आला आहे, त्याबद्दल उरण तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे आपले व महाराष्ट्र शासनाचे मनःपूर्वक आभार!

महाराष्ट्र शासनाने सिडकोच्या माध्यमातून नवी मुंबई हे नवे शहर उभारले गेले. याच नवी मुंबईला लागूनच असलेला उरणसारख्या एका टोकाला असलेला नवे शहर विकसित होत असलेल्या औद्योगिक व शहरीकरणामुळे आशिया खंडात उरण विकसीत शहर म्हणून गणले गेले. अशा उरणसारख्या शहराला मुंबईच्या जवळ १५ ते २० मिनीटांत न्हावा-शिवडी सी लिंक या पुलावरून मुंबईला कार्यालयीन किंवा इतर कामासाठी स्थानिकांना व इतर नागरिकांना प्रवास करणेसाठी फार उपयोग होणार आहे.

महाराष्ट्र शासन विकासाच्या नेहमीच एक पाऊल पुढे आहे, अशा प्रकल्पांमुळे अनेक शहरे मुंबईजवळ येणार आहेत, यात सर्वांत नवी मुंबईच्या सिडकोच्या माध्यमातून उरणसारख्या ठिकाणी असलेल्या गावांच्या स्थानिक शेतकऱ्यांचा विकासात मोलाचे योगदान, त्याग आहे. अशा स्थानिकांना मुंबईकडे कार्यालयीन कामासाठी जाण्या-येण्यासाठी न्हावा-शिवडी सिलिंक समुद्रमार्गे बांधलेल्या पूलावरून आपल्या स्वतःच्या वाहनांचा उपयोग होणार आहे, पण काही कामगारवर्ग, विद्यार्थीवर्ग व व्यापारीवर्ग नेहमी बसने व ट्रेनच्या माध्यमातून प्रवास करतात. याकरिता त्यांना मुंबईला पोहचण्याकरीता दोन ते तीन तास लागतात.

आपणास विनंती आहे की, मुंबई ते उरण शहर यादरम्यान अटल सेतू मार्गावरून बेस्ट बस सेवेचा लाभ मिळाल्यास स्थानिकांना, कामगार वर्गाला, विद्यार्थी वर्गाला व व्यापारी वर्गाला मुंबईला १५ ते २० मिनीटांत पोहचता येईल व त्यांचा २ ते ३ तासांचा वेळ वाचेल. उरण तालुका राष्ट्रवादी काँग्रेस कमिटीतर्फे मागणी करीत आहोत. या गोष्टीचा योग्य तो विचार व्हावा.

## संपादकीय

# इनकमिंगचा ओघ

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि चिन्ह उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे गेल्यानंतर राज्यातील राजकारणाचे चित्र वेगाने बदलताना दिसते आहे. भारतीय जनता पक्ष, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष या महायुतीमधील तिन्ही पक्षांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाबरहुकुम राज्याचा कारभार चालू ठेवण्याचा संकल्प केला आहे. महाराष्ट्रातील जनतेच्या दृष्टीने ही स्वागतार्ह बाब आहेच, पण त्याहूनही अधिक महत्त्वाचे म्हणजे इतर पक्षांमधून महायुतीकडे 'इनकमिंग'चा ओघ आतापासूनच सुरू झाल्याचे दिसायला लागले आहे.

**एखादा न्यायालयीन निर्णय स्वत:ला हवा तसा लागला तर तो सत्याचा विजय, आणि विरोधात गेला की सत्ताधाऱ्यांचे कारस्थान, अशी ओरड करण्याची सवयच विरोधीपक्षांना लागली आहे. सर्वोच्च न्यायालयापासून ईव्हीएमपर्यंत सर्वच बाबतीत अशी ओरड अनेकदा दिसली आहे. किंबहुना मोदी सरकारच्या गेल्या दहा वर्षांच्या कार्यकाळात विरोधी पक्षांनी सातत्याने नकारात्मक राजकारणच केले आहे, मात्र त्याचा परिणाम त्याच पक्षांना भोगावा लागतो आहे. इतक्या निवडणुकांमध्ये पराभवाचे चटके बसल्यानंतरही विरोधीपक्ष काहीच धडा शिकले नाहीत असे खेदाने म्हणावे लागते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा द्वेष करता करता विरोधीपक्षाचे अनेक नेते राष्ट्रहिताच्या विरोधात भूमिका घेऊ लागले ही निश्चितच दुर्दैवाची बाब आहे. जे राष्ट्रीय पातळीवर घडले तेच कमी–अधिक प्रमाणात महाराष्ट्रातही घडताना दिसत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नाव आणि पक्षचिन्ह उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटाला बहाल करण्याचा निर्णय निवडणुक आयोगाने घेतला. तो तसा अपेक्षितच होता. राष्ट्रवादी काँग्रेस फुटली की शिवसेनेप्रमाणेच केवळ नेतृत्वात बदल झाला याबाबतचा कायदेशीर कीस येत्या काळात सर्वोच्च न्यायालयात पाडला जाईल कारण निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरोधात उर्वरित राष्ट्रवादी काँग्रसचे नेते सर्वोच्च न्यायालयात गेले आहेत. त्यासंदर्भात आपली बाजू ऐकल्याशिवाय निवाडा केला जाऊ नये अशा आशयाचे 'कॅव्हेट' अजित पवार गटाने दाखल केले आहे. पंतप्रधान मोदी यांची धोरणे अथवा निर्णय सर्वसामान्य जनतेला मान्य आहेत याचे प्रत्यंतर एकदा नव्हे दोनदा आले. त्यांचे नेतृत्व मान्य करून महायुतीत सामील होण्याचा निर्णय शहाणपणाचा ठरेल असा विचार करून काही मोठे नेते महायुतीकडे वाटचाल करू लागले आहेत. काँग्रेसचे मुंबईतील तडफदार नेते मिलिंद देवरा यांनी काही दिवसांपूर्वीच मुख्यमंत्री शिंदे यांच्या शिवसेनेत उजळमाथ्याने प्रवेश केला. तसेच गुरुवारी काँग्रेसच्या बाबा सिद्दिकी यांनी पक्षाचा राजीनामा दिला. ते अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सामील होतील अशी चर्चा आहे. बाबा सिद्दीकी हे गेली ४८ वर्षे मुंबई काँग्रेसमध्ये कार्यरत होते हे येथे ध्यानात घ्यायला हवे. देवरा किंवा सिद्दीकी यांच्यासारख्या जाणत्या आणि अनुभवी नेत्यांना काँग्रेसची साथ सोडाविशी का वाटते, याचे आत्मपरीक्षण काँग्रेसनेच करायला हवे. नकारात्मक राजकारण अंतिमत: स्वत:च्याच पायावर कुऱ्हाड मारून घेणारी कृती ठरते. ठाकरे गटाचे नेते अजुनही मुख्यमंत्री शिंदे आणि त्यांच्या समर्थकांच्या नावाने छाती पिटून घेत आहेत. महाराष्ट्रासाठी आपण काय केले हे सांगण्याऐवजी सत्ताधारी पक्षांना शिव्यांची लाखोली वाहण्यात धन्यता मानत आहेत. या साऱ्या प्रकारांना जनता कंटाळली आहे. हे असेच चालू राहिले तर येत्या महिन्याभरात महायुतीतील 'इनकमिंग'चा ओघ लोंढ्यामध्ये रूपांतरित होईल यात शंका नाही.**

# कार्यकर्तृत्वाने शून्यातून विश्व निर्माण करणारे मुख्यमंत्री



भारतीय राजकारणात अनेक नेत्यांना–राज्यकर्त्यांना आपल्या वाडावडिलांचा पूर्वजांचा राजकीय वारसा प्राप्त झाला अन् त्यातून ते सत्तास्थानी विराजमान झालेत, परंतु एकनाथ त्याला अपवाद आहेत. त्यांनी आपल्या कार्यकर्तुत्वाने शून्यातून विश्व निर्माण करत नगरसेवक ते मुख्यमंत्री असा यशस्वी राजकीय प्रवास केला. हीच खरी त्यांच्या राजकारणातून समाजकारण करण्याची फलश्रुती आहे. त्यांच्या राजकीय कारकिर्दीतील सर्वांत उल्लेखनीय गोष्ट म्हणजे कोरोना काळात त्यांनी लोकनेत्याच्या भूमिकेतून तनमनधनाने रुग्णसेवा करत जीवाची बाजी मारून राज्यातील लाखो लोकांचे प्राण वाचविले. अशा धैर्यशाली रुग्णदुतास राज्याचा मुख्यमंत्री होण्याचा मान मिळाला, ही ठाणेकरांच्या दृष्टीने मोठ्या भाग्याची गोष्ट आहे. आमचा घरचा माणूस मुख्यमंत्री झाला, अशी मानसिकता ठाणेकरांची झाली. महत्त्वाचे म्हणजे बाळासाहेबांनी रक्ताचे पाणी करून उभ्या केलेल्या शिवसेनेला मजबूत करण्यासाठीशिंदेसाहेब हे गेल्या चार दशकांपासून हिंदुत्वाशी नाळ अटूट ठेवत निष्ठापूर्वक काम करत आहेत. त्याचं फलित म्हणून त्यांना मुख्यमंत्री पद मिळाले, असे म्हणणे योग्य ठरेल.

शिवरायांच्या महाराष्ट्रातील मराठ्यांचा सात दशकापासून प्रलंबित पडलेला आरक्षणाचा प्रश्न अखेर सातारच्या शिंदे घराण्यातील संभाजीरावांचे सुपुत्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रामाणिक प्रयत्नांतून मार्गी लागला. त्यामुळे राज्यात सर्वदूर मराठा समाजाच्या सदस्यांनी हर्षोल्हासात गुलाल उधळत विजयश्री साजरी केली. तसेच त्यांनी शिंदे सरकारला कोटी कोटी धन्यवाद दिले. गेल्या सात दशकात राज्यात मराठा समाजाचे अनेक मुख्यमंत्री झाले, परंतु त्यातील एकानेही मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडविण्यात रस दाखविला नाही, परंतु मुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्याला अपवाद ठरले अन् त्यांनी हे आरक्षण अवघ्या दीड वर्षाच्या कारकिर्दीत मिळवून दिले. चला तर करूया... शिवछत्रपतींना त्रिवार मानाचा मुजरा!

सर्वसामान्य माणसाची सेवा करण्याचा ध्यास घेतलेल्या भाईंनी आपल्यावर कोसळलेल्या दोन लेकरांच्या आकस्मिक दु:खाचा डोंगर बाजूला सारून केवळ ठाणेच नव्हे तर, सारा महाराष्ट्र हेच माझे कुटुंब मानून, शिंदेसाहेबांनी राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी समर्पित भावनेने लोकहिताची कामे करण्यास स्वत:ला झोकून घेतले. आधी करून दाखवायचे नंतर बोलायचे ही भूमिका स्वीकारून त्यांनी आपली राजकारणातून समाजकारणकडे वाटचाल सुरू केली. आई जगदंबे, शिंदेसाहेबांना रुग्णसेवेसाठी उदंड आयुष्य देवो, अशी चरणी प्रार्थना.

शिवछत्रपतींच्या साताऱ्याच्या जन्मभूमीची माती ललाटी लावून शून्यातून विश्व निर्माण करण्याचं स्वप्न साकारण्यास ठाणे या सांस्कृतिक नगरीत शिंदेसाहेबांनी पदार्पण केले अन् त्यांच्या जीवनाला मोठी कलाटणी मिळाली. शिवसेनाप्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जहाल, परखड अन् ओजस्वी वाणीने प्रेरित होऊन, तर धर्मवीर आनंद दिघेसाहेबांच्या शिकवणीने वयाच्या अवघ्या २० व्या वर्षीच त्यांनी शिवसेनेच्या हिंदुत्वाचा भगवा ध्वज हाती घेतला आणि बघता–बघता त्यांचे राजकीय, सामाजिक व आध्यात्मिक जीवन भगवामय झाले.

क्षत्रिय मराठा बाणा जपून रुग्णसेवेसाठी आपला जीव पणाला लावणाऱ्या लोकनेत्याचा जन्म ९ फेब्रुवारी १९६४ रोजी सातारा जिल्ह्यातील जावळी क्षेत्रातील दरे या छोट्याश्या गावी आई गंगूबाई संभाजीराव यांच्या उदरी झाला. अन् महाराष्ट्रात हिंदुत्वाची ज्योत तेजोमय करण्यासाठी जणू तो सूर्यावानी उदयास आला.

सातारा जिल्ह्यातील रहिवासी असलेले श्रीमान संभाजीराव नवलू शिंदे यांची आर्थिक परिस्थिती बेताची होती. या पार्श्वभूमीवर साऱ्या कुटुंबीयांसह ठाणे येथे स्थायिक होऊन भाईंनी उदरनिर्वाहसाठी रिक्षाचालक म्हणून जीवनाची सुरुवात केली. त्यानंतर आपल्या कठोर परिश्रम, निष्ठा, प्रामाणिकपणा व नेतृत्वगुणाच्या जोरावर रिक्षाचालकांची मने जिंकून त्यांनी ठाणे रिक्षा युनियनचे अध्यक्षपद भूषविल, मात्र त्याआधी त्यांनी आपले प्राथमिक शिक्षण किसननगर येथील महापालिकेच्या शाळा न.३ मध्ये, तर माध्यमिक शिक्षण कोपरी–ठाणे येथील मंगला विद्यालयात पूर्ण केले. त्यानंतर मात्र त्यांचे पुढील शिक्षण आर्थिक विवंचनेमुळे खंडित झाले. तथापि, त्यामागील मुख्य कारण होते, ते म्हणजे श्रीकांतदादांचे डॉक्टर होऊन गोरगरिबांची आरोग्य सेवा करण्याचं स्वप्न साकार करण्याचे. असे असूनही त्यांनी पुढील शिक्षण घेण्याची जिद्द व दुर्दम्य इच्छा मात्र आपल्या मनात कायम जिवंत ठेवली. कालांतराने त्यांनी कोरोनाशी लढा देत असताना आपल्या जिद्द व अभ्यासूवृत्तीच्या बळावर आपले ग्रॅज्युएशन पूर्ण केले. काहीही होवो, कुठल्याही परिस्थितीत मागे हटायचे नाही, हा त्यांच्या स्वभावातील जणू स्थायीभावच! कारण जेथे संकट तेथे 'अनाथांचे नाथ एकनाथ' हे हजर आहेतच, असे गृहीत धरा. मग वादळ असो वा अतिवृष्टी; रस्त्यावरील अपघाताची घटना असो वा इमारत दुर्घटना; किंवा एखाद्या गोरगरीब निर्धन रुग्णाला अर्थसहाय्यची निकड... अशा व अन्य संकटकाळाच्या वेळी मदतीचा हात देण्यास 'लोकनाथ' प्रगट झालेच समजा.

दरम्यान, आपल्या सामाजिक कार्य करण्याच्या आवडीने अन् कठोर परिश्रमाने त्यांनी दिघेसाहेबांचा विश्वास संपादन केला. त्यातून पुढे त्यांना शाखा प्रमुख होण्याची संधी दिली. त्या पदासदेखील त्यांनी न्याय दिला. तेथेही भाईंनी शिवसेनेसाठी रात्रंदिवस निष्ठेने काम करून वंदनीय बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघेसाहेब यांची मने जिंकली.

वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या आशिर्वादाने अन् धर्मवीर आनंद दिघेसाहेब यांच्यासारख्या नि:स्वार्थी व सदाचारी गुरूंच्या सानिध्यात जडणघडण झालेले एकनाथजी हे पुढील काळातही राजकीय व सामाजिक जीवनात नेहमी यशाची उत्तुंग शिखरे गाठतील, हे निश्चित. गेल्या दोन वर्षांच्या कोरोना काळात ठाणे–गडचिरोली जिल्ह्यांचे पालकमंत्री म्हणून शिंदेसाहेबांनी सर्वधर्मीय लोकांच्या जीवांचे रक्षण करण्यासाठी अन् त्याबरोबरच कोरोना नियंत्रित करण्याकरिता कोविड हॉस्पिटल्स अन् अन्य वैद्यकीय साधनसामग्री ज्या गतीने उपलब्ध करून दिली, त्याची प्रशंसा करावी तेवढी कमीच आहे. दिवसातील किमान १८ तास काम करून लोकनेते एकनाथ शिंदेसाहेब हे राज्यातील शेवटच्या माणसाला न्याय देण्यास कटिबद्ध आहेत. तनमनधनाने काळजी घेणारे अन् त्यांना संकटसमयी मदतीचा हात देणारे शिंदेसाहेब यांची तुलना माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांच्याशी करणे बहुतांशी योग्य ठरते.

आपल्या मुख्यमंत्री पदाच्या कारकिर्दीत राज्यातील गोरगरीब, गरजू, मागास व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे घरकुल, शिक्षण, रोजगार–स्वयं रोजगार, आरोग्य हे मूलभूत प्रश्न मार्गी लागोत अन् त्यांच्या जीवनात सुख – समृद्धी येवो, हीच सदिच्छा! आपल्या कार्यकाळात अन्नदाता बळीराजाच्या आत्महत्या कशा थांबतील,या दृष्टीने ठोस उपाययोजना व्हाव्यात. कृषी विषयक जिव्हाळ्याचे प्रश्न मार्गी लावत, त्यांची आर्थिक उन्नती व्हावी. त्यासह आपले राज्य सुजलाम सुफलाम होण्यासाठी ठोस पावले उचलावीत.राज्यातील बेरोजगारी दूर होण्यासाठी राज्य सरकारने विविध शासकीय आस्थापनांमधील रिक्त पदे त्वरेने भरावीत. महिलांची सुरक्षितता या विषयाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. आदिवासी क्षेत्रातील माता व बालकांचे कुपोषण थांबविण्यासाठी संबंधित शासकीय यंत्रणा सक्षम कराव्यात, म्हणजे मृत्यूदर कमी होण्यास मदत होईल. मुंबईतील कामगार व पोलीस यांना त्यांच्या स्वप्नातील घरकुले त्वरेने उभारून द्यावीत. सध्याच्या महागाईच्या अनुषंगाने दिव्यांगांच्या पेन्शनमध्ये भरीव वाढ करण्यात यावी, असे आपणास कळकळीचे सांगणे आहे.

वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांनी निष्ठावान शिवसैनिकाने राज्याचे मुख्यमंत्री व्हावे, हे स्वप्न पाहिले होते. ते स्वप्न ज्येष्ठ शिवसैनिक एकनाथजी शिंदे यांच्या माध्यमातून पूर्ण झाले, याचा राज्यातील तमाम शिवप्रेमींना सार्थ अभिमान आहे. साहेब, तुमच्या हातून राज्याचे वैभव द्विगुणित होवो आपणास पुढील यशस्वी वाटचालीसाठी भगव्या शुभेच्छा!

जय हिंद! जय महाराष्ट्र!

**–रणवीरसिंह राजपूत, गवर्नमेंट मीडिया, महाराष्ट्र शासन**
**सहकार्य–मंगेश चिवटे, मुख्यमंत्र्यांचे ओ.एस.डी, मंत्रालय**



## बदलते तंत्रज्ञान

# सरकारच्या इशाऱ्यानंतर गुगलने हटवले 'हे' ॲप

केंद्र सरकार फसवणूक करणाऱ्या लोन ॲप्सविरोधात सातत्याने कारवाई करत आहे. अर्थ राज्यमंत्री भागवत कराड यांनी राज्यसभेत लेखी उत्तरात सांगितले की, सरकार या प्रकरणी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) आणि इतर नियामकांसोबत काम करत आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या (MeitY) माहितीनुसार, एप्रिल २०२१ ते जुलै २०२२ दरम्यान, Googleने सुमारे ३,५०० ते ४,००० लोन ॲप्सची तपासणी केली आणि २,५०० हून अधिक प्स Play Storeवरून काढून टाकले.




सप्टेंबर २०२२ ते ऑगस्ट २०२३ पर्यंत २,२०० हून अधिक लोन ॲप्स Google Play Store वरून काढून टाकण्यात आले आहेत. त्यांनी सांगितले की, 'गुगलने प्ले स्टोअरवरील लोन प्सबाबत आपले नियम अधिक कठोर केले आहेत. आता केवळ अशा कंपन्यांचे कर्ज ॲप्स प्ले स्टोअरवर असू शकतात, जे सरकारी नियमांचे पालन करतात किंवा कोणत्याही सरकारी मान्यताप्राप्त कंपनीच्या सहकार्याने काम करतात.

त्यांनी सांगितले की, 'रिझर्व्ह बँकेने डिजिटल कर्जाबाबत नवीन नियम जारी केले आहेत. डिजिटल कर्ज देण्याची प्रक्रिया स्वच्छ आणि सुरक्षित करणे हा त्यांचा उद्देश आहे, जेणेकरून ग्राहकांना कोणतीही अडचण येणार नाही तसेच गृह मंत्रालयाचे (MHA) इंडियन सायबर क्राइम कोऑर्डिनेशन सेंटर (I4C) डिजिटल लोन प्सवर सतत नजर ठेवत आहे. नागरिकांना बेकायदेशीर कर्ज प्ससह सायबर गुन्ह्यांची तक्रार करण्यात मदत करण्यासाठी, गृह मंत्रालयाने राष्ट्रीय सायबर गुन्हे अहवाल पोर्टल (www.cybercrime.gov.in) आणि राष्ट्रीय सायबर गुन्हे हेल्पलाइन सुरू केली आहे. '१९३०' हा क्रमांक सुरू झाला आहे.

ते पुढे म्हणाले की, सायबर गुन्ह्यांबाबत लोकांना जागरुक करण्यासाठी सरकार अनेक महत्त्वाची पावले उचलत आहे. यामध्ये सोशल मीडिया खात्यांद्वारे सायबर सुरक्षा टिप्स देणे, किशोरवयीन आणि विद्यार्थ्यांसाठी हँडबुक प्रकाशित करणे, सरकारी अधिकाऱ्यांसाठी माहिती प्रकाशित करणे, राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या सहकार्याने सायबर सुरक्षा आणि जागरूकता सप्ताह आयोजित करणे इत्यादींचा समावेश आहे. याशिवाय सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृती करण्यासाठी रिझर्व्ह बँक आणि इतर बँकांनीही अनेक प्रकारे काम केले आहे. यामध्ये फोन मेसेज पाठवणे, रेडिओवर जाहिराती देणे आणि 'सायबर गुन्हे रोखण्याच्या मार्गांची माहिती देणे यांचा समावेश आहे.

# थोर समाजसेवक बाबा आमटे

## निमित्त



कुष्ठरुग्णांच्या पुनर्वसनासाठी आयुष्य वाहून घेणारे थोर समाजसेवक डॉ. मुरलीधर देविदास ऊर्फ बाबा आमटे यांचा आज स्मृतीदिन (९ फेब्रुवारी २००८) आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...बाबांचे मूळ नाव मुरलीधर देविदास आमटे. त्यांचा जन्म २६ डिसेंबर १९१४ रोजी वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथे झाला. बाबांचे कुटुंब त्या भागातील जमीनदार कुटुंब होते. श्रीमंती परंपरागतरित्या चालत आलेली होती. सहाजिकच बाबांचे लहानपणही अतिशय ऐश्वर्यात गेले. बाबांकडे वयाच्या चौदाव्या वर्षी स्वत:ची बंदूक होती आणि तो हरणांच्या शिकारीला जंगलात जायचे, बाबांच्या कुटुंबाची स्थिती सांगायला एवढी एक बाब पुरेशी आहे.

बाबांना लहानपणी चित्रपट फार आवडायचे. इंग्रजी चित्रपट त्यांच्या विशेष आवडीचे. अनेक नियतकालिकांसाठी ते त्या काळी चित्रपटांचे परीक्षण लिहित असत. ग्रेटा गार्बो आणि नोर्मा शेअरर यासारख्या कलावंतांशी त्यांचा पत्रव्यवहार होता. पुढे बाबांनी कुष्ठरोग्यांसाठी काम सुरू केले, तेव्हा त्यांच्या कामात पहिली मदत नोर्मा शेअरर हिचीच मिळाली होती, हे उल्लेखनीय. बाबांना लहानपणी कार चालवत यायला लागली तेव्हा एक स्वतंत्र स्पोर्ट्स कार देण्यात आली. पण बाबा लहानपणापासून स्वतंत्र विचारांचे होते. बालपण ऐश्वर्यात गेले असले तरी त्या वयातही त्यांना एक सामाजिक जाण मनात होती. त्यामुळे खेळण्यात त्यांचे अनेक मित्र खालच्या जातीचे होते. बंधने असली तरी बाबा त्यांच्यात मिसळत असत.

कॉलेजच्या दिवसात बाबांनी अख्ख्या भारताची परिक्रमा केली. रवींद्रनाथ टागोरांच्या संगीत आणि कवितांनी प्रभावित झालेल्या बाबांनी त्यांच्या शांतीनिकेतनलाही भेट दिली. टागोरांचा बाबांवर बराच प्रभाव होता. तितकाच प्रभाव वर्ध्याजवळच सेवाग्राम येथे आश्रम असलेल्या महात्मा गांधींचाही होता. मार्क्स व माओ यांच्या विचारांनीही बाबांना आकर्षिले होते. पण त्यांच्या विचारांच्या अंमलबजावणीसाठी रशिया व चीन या दोन्ही देशातील क्रांती मात्र त्यांना आवडली नाही. साने गुरूजींचाही बाबांवर बराच प्रभाव पडला होता.

एके दिवशी त्यांनी एक कुष्ठरोगी माणूस पाहिला. हातपाय झडलेले, भर पावसात भिजत असलेला तो माणून पाहिला आणि ते भयंकर घाबरले. पण तोच त्यांच्या आयुष्यातील टर्निंग पॉईंट ठरला. पुन्हा परतून त्यांनी त्या माणसाची सेवा केली. पण तो जगला नाही. पुढचे सहा महिने याच उलघालीत गेलेल्या बाबांनी अखेर कुष्ठरोग्यांसाठी काम करण्याचे ठरविले आणि पत्नी साधनानेही त्यांना या निर्णयात साथ दिली. त्यानंतर मग त्यांनी आनंदवन उभारले.

तेथे त्यांनी कुष्ठरोग्यांच्या रहाण्याची सोय केली. त्यांची सेवा करण्याचे व्रत आरंभले. त्यासाठी ते कुष्ठरोग्यांवरील उपचारही शिकून आले. आनंदवनात कोणतीही सोय नव्हती. त्यांनी या उजाड परिसराचे नंदवन केले. आनंदवन स्वयंपूर्ण व्हावे यासाठी तेथे शेती सुरू केली. आनंदवन हे जगभरातील लोकांसाठी कुष्ठरोग्यांसाठी एक उदाहरण ठरले.

पुढे बाबांनी एवढं उभारल्यानंतरही ते शांत बसले नाही. ऐंशीच्या दशकात संपूर्ण भारत अतिरेक्यांच्या कारवाया, फूटीच्या धमक्या अशा बाबींनी ग्रस्त असताना बाबांनी भारत जोडण्यासाठी कन्याकुमारी ते काश्मीरव गुजरातपासून अरूणाचल प्रदेशापर्यंत भारत जोडो नावाची यात्रा काढली. शांतता निर्माण करणे व पर्यावरणाबद्दल जागृती हे या यात्रेचे मुख्य हेतू होते. १९९० मध्ये बाबांनी आनंदवन सोडले आणि ते नर्मदेच्या किनारी येऊन रहायला लागले. नर्मदा आंदोलनाला बळ देण्यासाठी त्यांनी हा निर्णय घेतला. बाबांना अनेक मानसन्मान मिळाले. पद्मश्री, पद्मविभूषण, गांधी शांतता पारितोषिक, रॅमन मॅगसेसे पुरस्कार असे अनेक पुरस्कार मिळाले.

**(साभार : इंटरनेट)**

## क्लिक...क्लिक...!




**रोहा : मध्य रेल्वेकडून वयोमर्यादा पूर्ण झालेली रेल्वे इंजिन्स, अतिरिक्त डिझेल इंजिन्स, वापरात नसलेले रेल्वे रूळ, वयोमर्यादा पूर्ण झालेली अपघाती इंजिन्स, रेल्वे डब्बे यासह विविध प्रकारचे भंगार वर्गीकरण करून त्यांची विल्हेवाट लावली जाते.**

## आरोग्य प्रहर

# औषधांचा वापर न करता किडनी स्टोन करू शकता दूर

किडनी स्टोनच्या उपचारासाठी अनेक प्रकारची औषधे बाजारात आहेत. त्यासोबतच ऑपरेशन करून यापासून सुटका मिळवली जाऊ शकते. काही घरगुती उपायांनीही किडनी स्टोनपासून आराम मिळवू शकतात. चला जाणून घेऊया काही घरगुती उपाय...



**तुळशीच्या पानांचा रस** : तुळशीमध्ये एसिटिक ॲसिड असते, जे किडनीतील स्टोन तोडण्यासाठी आणि वेदना कमी करण्यासाठी मदत करते. तुळस आरोग्यासाठी फायदेशीर असते. तुळशीच्या रसामध्ये अँटी–ऑक्सिडेंट आणि अँटी–इन्फ्लेमेटरी तत्व असतात. यामुळे किडनी निरोगी ठेवण्यास मदत मिळते.

**लिंबाचा रस आणि ऑलिव्ह ऑइल** : वर्षानुवर्षे लिंबाचा रस आणि ऑलिव्ह ऑईल मिक्स करून गॉलब्लेडरच्या स्टोनसाठी सेवन केले जाते, पण हा उपाय किडनी स्टोनसाठीही फायदेशीर आहे. लिंबाच्या रसात असलेले सॅट्रिक ॲसिडमध्ये कॅल्शिअम बेस असलेल्या स्टोनला तोडण्याची क्षमता असते आणि पुन्हा स्टोन तयार होऊ देत नाही.

**डाळिंब** : डाळिंबाचा रस आणि बीयांमध्ये ॲस्ट्रीजेंट गुण असतात, जे किडनी स्टोनवर उपचारासाठी फायदेशीर असतात. जर तुमच्या किडनीमध्ये स्टोन असेल तर रोज एक डाळिंब खावे किंवा त्याचा रस फायदेशीर होऊ शकतो. यासोबतच डाळिंबाला फ्रूट सॅलडमध्येही मिश्रित करुन खाऊ शकता.

**कलिंगड** : मॅग्नेशिअम, फॉस्फेट्स, कार्बोनेट आणि कॅल्शिअमपासून तयार झालेल्या किडनी स्टोनच्या उपचारासाठी कलिंगड फारच उपयुक्त आहे. कलिंगडामध्ये मोठ्या प्रमाणात पोटॅशिअम असते, जे किडनीसाठी फारच उपयुक्त आहे. पोटॅशिअम लघवीतील ॲसिड लेव्हल नियंत्रित ठेवण्यासाठी मदत करते. कलिंगडामध्ये मोठ्या प्रमाणात पाणीही असते. यामुळे स्टोन नैसर्गिक पद्धतीने शरीराबाहेर काढला जाऊ शकतो.

**राजमा** : राजम्यामध्ये अधिक प्रमाणात फायबर असते. राजमा हा किडनी बिन्स नावानेही ओळखला जातो. राजमा किडनी आणि ब्लेडरशी संबंधित वेगवेगळ्या आजारांवर उपाचारासाठी फायदेशीर आहे. ज्या पाण्यात राजमा भिजवून ठेवला असेल ते पाणी प्यायल्यासही फायदा होतो.

**ओव्याचे पाणी** : ओव्याचे पाणी शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करते. याने किडनी स्टोनची समस्या दूर करण्यासही मदत मिळते. याचा वापर फार आधीपासून पारंपारिक औषधी म्हणून केला जातो.

**व्हीटग्रास ज्यूस** : व्हीटग्रासमध्ये अनेक पोषक तत्व असतात आणि आरोग्य चांगले ठेवण्यासाठी यातून अनेक फायदे मिळतात. व्हीटग्रास किडनी स्टोन दूर करण्यासही मदत करते.

# महायुतीच्या विजयासाठी एकत्रित व ताकदीने काम करावे

## भाजप प्रदेश उपाध्यक्ष अतुल काळसेकर यांचे आवाहन



**पाली : प्रतिनिधी**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी ४०० पार खासदार संकल्प पूर्तीसाठी महायुतीला एकत्रितपणे ताकदीने काम करायचे आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे संपूर्ण महाराष्ट्रभर महायुतीचे उमेदवार निवडून आणण्यासाठी फिरत आहेत. रायगड लोकसभा मतदारसंघात धैर्यशील पाटील यांना उमेदवारी मिळावी, अशी आमच्या सर्वांचीच इच्छा आहे. आता सर्वांनी एकत्रित ताकदीने काम करावे, असे आवाहन भाजप महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष अतुल काळसेकर यांनी केले आहे.

रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यात भाजप कार्यकर्त्यांचे जोरदार मेळावे पार पडत आहेत. पेण सुधागड मतदारसंघातील कार्यकर्ता मेळावा पालीत शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालयाच्या प्रांगणात झाला. या वेळी आमदार रवींद्र पाटील, ज्येष्ठ नेते बाळासाहेब पाटील, दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष माजी आमदार धैर्यशील पाटील, माजी जि. प. अध्यक्ष ॲड. निलीमा पाटील, भाजप जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा, भाजप जिल्हा सरचिटणीस गीता पालरेचा, सुधागड तालुकाध्यक्ष श्रीकांत ठोंबरे, वैशाली मपारा, चंद्रकांत गोफण, हिराकांत भगत, आरिफ मणियार, आलाप मेहता, पराग मेहता, गणेश सावंत, रमेश साळुंके, जुई ठोंबरे, संजोग शेठ, नरेश खाडे, प्रणाली शेठ, सौ. साठे, भास्कर पाष्टे, ज्ञानेश्वर फोंडे, शरद चोरघे, सुशील शिंदे, रोहन दगडे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांनी, माझं माहेरघर सुधागड आहे. निवडणुकीत शिवधनुष्य उचलायचे असेल तर त्यासाठी एकटा धैर्यशील किंवा एकट्या पक्षाचे ते काम नाही. त्यासाठी तुम्हा सर्वांची साथ गरजेची आहे. तुमचा भक्कम पाठिंबा असेल तर कुणालाही पराभूत करण्याची क्षमता आपल्यात आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या वेळी आमदार रवीशेठ पाटील यांनीदेखील महायुतीच्या उमेदवाराला बहुमताने निवडून आणण्याचे आवाहन करीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश झपाट्याने प्रगतीपथावर जात असल्याचे सांगितले. महाराष्ट्र प्रदेश सदस्य राजेश मपारा, जिल्हा सरचिटणीस गीता पालरेचा, श्रीकांत ठोंबरे, आलाप मेहता, आरिफ मणियार यांचीही दमदार आणि कार्यकर्त्यांच्या अंगात ऊर्जा निर्माण करणारी भाषणे झाली.


## ई-निविदा सूचना

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणाऱ्या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी-१३२, टी-१३३, टी-१३४, टी-१३५, टी-१३६ आणि टी-१३७/(२०२३-२४) अशा एक निवीदा महावितरण कंपनीच्या **www.mahadiscom.in** या **e-Tender** च्या संकेतस्थाळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निवीदा विक्रीसाठी दि. ०८.०२.२०२४ पासून ते दि. १४.०२.२०२४ पर्यंत उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीख दि. १५.०२.२०२४ ला दुपारी १.०० वाोपर्यंत आहे. निवीदेच्या आवृत्तीत/तारखा/ इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईवर प्रकाशित केले जाईल.

**कार्यकारी अभियंता (स्था.)**
**स्थापत्य विभाग, भांडुप**

## ई-निविदा सुचना

महावितरण तर्फे अधीक्षक अभियंता, पेण मंडळांतर्गत Substation Breakdown Maintenance साठी Empanelled Agency साठी (एप्रिल २०२४ ते मार्च २०२५या कालावधीसाठी) Substation Breakdown Maintenance कामे करण्यासाठी कंत्राटदारांकडुन निविदा क्र. T-07/2023-24 साठी ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा महावितरण कंपनीच्या संकेतस्थळावर (**https://etender.mahadiscom.in/eatApp**) दि.०५.०२.२०२४ ते दि. २१.०२.२०२४ (सहाळी १०:३० वा) पर्यंत उपलब्ध आहेत. तसेच निविदा दि. २१.०२.२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. निविदासंदर्भात अधिक माहितीसाठी कार्यकारी अभियंता (प्रशासन)पेण मंडळ भ्रमणध्वनी क्र. ९०२९११२७७७ वर संपर्क साधावा. निम्नस्वाक्षरीकार यांनी कुठलेही कारण न देता सर्व निविदा स्विकारणे अथवा रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे. तसेच कंत्राटदारांना विनंती करण्यात येते की, महावितरण च्या निविदा संकेतस्थळावर आपली नोंदणी करुन घ्यावी. तसेच निविदोबाबत काही मुदतवाढ किंवा शुध्दी पत्रकाबाबत फक्त संकेतस्थळावरील "Annoncements" मध्येच कळविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**अधीक्षक अभियंता (पेमं)**
**मंडळ कार्यालय, पेण**

PRO No. 235 dtd: 05.02.20204


# खालापुरातून दोन अल्पवयीन मुलींचे पलायन

**खोपोली : प्रतिनिधी**

तालुक्यातून वेगवेगळ्या ठिकाणी राहणाऱ्या दोन अल्पवयीन मुलींनी पलायन केल्याची घटना घडली आहे.

वावोशी येथील अल्पवयीन मुलगी बुधवारी (दि. ७) सकाळी शाळेत गेली होती. शाळा सुटल्यावर मुलगी घरी न आल्याने पालकांनी शाळेत चौकशी केली, परंतु माहिती मिळाली नाही. पालकांनी डोणवत येथील मुलीच्या मित्राच्या घरी जाऊन शोध घेतला तेव्हा मुलगादेखील घरी नसल्याचे लक्षात आले. मुलाचा मोबाईलदेखील बंद आहे. त्यामुळे पालकांनी खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

दुसऱ्या घटनेत चिन्मयनगर खोपोली येथील १७ वर्षांची मुलगी घरातून डॉमिनोज येथे प्रशिक्षणासाठी जाते, असे सांगून निघून गेली ती घरी परत आली नाही. त्यामुळे तिला फूस लावून पळवून नेल्याची तक्रार पालकांनी खोपोली पोलीस ठाणे येथे केली आहे.


## MAHATRANSCO — E- Tender NOTICE

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/ 400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost | Submission date |
|---|---|---|---|---|
| 2 | e-Tender-26/23-24/70000029689 | Work of anticorrosive coating & Painting of various ICTs Units and Transformers BY APPLYING ONE COAT OF RED OXIDE (Asian make) AND TWO COATS OF Asian make synthetic Enamel paint of light gray grade 631 at 400 kV Nagothane S/S under 400 KV R.S. (O&M) Division Nagothane..1st Ext.. | Rs. 22,49,540.37/- | 14.02.2024 up to 23.59 hrs |

**EMD 1% of Estimate cost &** Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: Mitesh Goyal (DY.EE) Mob No. 9461456635 Email ID: ee7230@mahatransco.in Note: All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER, 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**

## MAHAVITARAN — TENDER NOTICE

Following Tender is invited from Eligible Bidders by E-tendering Process under Goregaon Division under Pen Circle Raigad District. The Details are as below

| S. N. | Tender No. | Nature of Work | Amount of EMD in Rs. | Tender Cost Fee in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | EE/GRN/E-Tender/ BMHT/T-01/ 2024-25 | Empanelment of agencies for Breakdown Maintenance of HT overhead lines and underground cables in Goregaon Division Pen Circle for FY 2024-25 on partial turnkey basis. | 10000/- | 1000-+18 % GST =1180/ |
| 2 | EE/GRN/E Tender/BM LT/T-02/2024-25 | Empanelment of agenies for Breakdown Maintenance of LT overhead lines, LT underground cables, & Fuse calls in Goregaon Division Pen Circle for FY 2024-25 on partial turnkey basis. | 10000/- | 1000-+18 % GST =1180/ |
| 3 | EE/GRN/E Tender/ BM DIC/T-03/2024-25 | Empanelment of agencies for Breakdown Maintenance of Distribution Transformer Centre in Goregaon Division Pen Circle for FY 2024-25 on partial turnkey basis. | 10000/- | 1000-+18% GST =1180/ |
| 4 | EE/GRN/E Tender/ NSC/ T-4. 04/2024-25 | Empanelment of Agencies for Infrastructure development for release of new connections (RCI and others) in Goregaon Division Pen Circle | 25000/- | 10000-+18% GST =1180/ |

The Tender Documents are available on MSEDCL http://works.mahadiscom.in/eTender/etender & can be downloaded from Mahadiscom website from Dt.05.02.2024 to Dt.23.02.2024. The Bidders are requested to get registered for E-tendering Procedure. Contact Person- Addl.Executive Engineer Mob no - 7875765592 MSEDCL Ltd. Chinchvali, Goregaon Tal:Mangaon Dist.-Raigad-402103.

**Executive Engineer**
**Gregaon Division**


# रायगड जिल्ह्यातून थंडी गायब

**रायगड** : जानेवारी महिन्याच्या शेवटापासून जिल्ह्यात थंडीत जोर धरला होता, मात्र आता काही दिवसांपासून थंडी गायब झाल्याने नागरिकांचा हिरमोड झाला आहे. हवेत उष्णता जाणवण्यास सुरुवात झाली असून रात्रीच्या वेळीही कमाल वातावरण जास्त जाणवत आहे.


## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक १४१/२०२३-२०२४ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | पेण अलिबाग रिजन पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. पेण अलिबाग रिजन पाणीपुरवठा योजनेच्या शुध्द गुरूत्व जलवाहिनीच्या साखळी क्र. ४०० जवळ संरक्षण भिंत बांधणे व साखळी क्र. ७२० मिटर ते ८९०.०० मीटर दरम्यानच्या सेवा रस्त्यालगत पावसाळी गटर तयार करणे व इतर कामे करणे. | ₹ ३६,९९,५२४.०० |
| २ | रानसाई वॉटर वर्क्सची देखभाल व दुरूस्ती.. रानसई पाणी पुरवठा योजनेतील फुल बोअर इलेक्ट्रोमॅग्नेटिक फ्लो मीटरची वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ २२,३८,९६८.०० |
| ३ | महाड औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती.. वडवली गावापासून सामाईक सांडपाणी प्रक्रीया केंद्रापर्यंतच्या सांडपाणी निःसारण वाहिनीवरील गळतीमुळे दूषित होणारे पाणी उचलणे. | ₹ १६,१०,२५०.०० |
| ४ | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती.. तळोजा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी संकलन चेंबर्सवर हेवी ड्यूटी आरसीसी कव्हरचा पुरवठा करणे तसेच तळोजा येथील आरसीसी चेंबर्सची दुरुस्ती करणे. | ₹ १५,३५,६९५.०० |
| ५ | रोहा येथील पाणीपुरवठा योजना व सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती.. रोहा येथील सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्रातील बंद पडलेल्या २२/०.४३३केव्ही, ३१५ केव्हीए ट्रान्सफॉर्मर, एलटी स्टार्टर पॅनेलची विविध कामांसह दुरुस्ती व रिवाइंडिंग करणे. तसेच शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यासाठी रस्ता क्रॉसिंगसाठी एमएस पाईप टाकणे. | ₹ १४,६८,४१७.०० |

उपरोक्त वरील कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक ०९/०२/२०२४ ते दिनांक १६/०२/२०२३ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक १२/०२/२०२४ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १४/०२/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.


# पोलीस निरीक्षक देविदास मुपडे यांनी स्वीकारला पदभार



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा पोलीस स्टेशनचे निरीक्षक प्रमोद बाबर यांची ठाणे ग्रामीण येथे बदली झाल्यामुळे त्यांच्या जागी निरीक्षक म्हणून देविदास मुपडे यांची नियुक्ती झाली आहे. त्यांनी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला आहे.

पोलीस निरीक्षक देविदास मुपडे हे उच्चशिक्षित असून २०१० साली ते पोलीस सेवेत रुजू झाले. त्यानंतर ते विलेपार्ले डोमेस्टिक एअरपोर्ट पोलीस स्टेशन, ओशिवरा लोखंडवाला पोलीस स्टेशन, अंधेरी एमआयडीसी पोलीस स्टेशन, मुंबई स्पेशल क्राईम ब्रँच या विविध विभागामध्ये अतिशय उत्तम कामगिरी बजावल्यामुळे त्यांचे प्रमोशन २०२२मध्ये रेवदंडा पोलीस स्टेशनमध्ये झाले. त्यानंतर रायगड स्पेशल क्राईम ब्रांच, रायगड सिक्युरिटी क्राईम ब्रँचमध्येदेखील त्यांनी काम केले आहे. या वेळी ते म्हणाले, पुढच्या काळात रोह्यात शांतता ठेवण्यासाठी तसेच कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे. जर कोणाला अवैधरित्या काही गोष्टी चालताना दिसत असतील तर माझ्याशी थेट संवाद साधू शकता.


## जाहीर निविदा

**ग्रुप ग्रामपंचायत बीडखुर्द ता.खालापूर,जि.रायगड** दि.०८/०२/२०२४

सर्व बांधकाम ठेकेदार यांस जाहीर निविदाद्वारे कळविण्यात येते कि,ग्रामपंचायत बीडखुर्द ता. खालापूर जि.रायगड यांजकडून ग्रामपंचायत १५वा वित्त आयोग योजनेतून कामाच्या अनुभवी इच्छुक जीएसटी धारक व गव्हर्नमेंट रजिस्टर ठेकेदाराकडून लिफाफा पद्धतीने मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी ज्या ठेकेदारांना सदरची कामे करावयाची आहेत त्यांनी आपली निविदा दि.०९/०२/२०२४ पासून १५/०२/२०२४ या कालावधीत कार्यालयीन वेळेत समक्ष ग्रामपंचायत कार्यालयात सादर करावी. व सदर निविदा दि. १६/०२/२०२४ रोजी ठीक सकाळी ११.३० वा.मा. सरपंच ,सदस्य, ठेकेदार यांच्या उपस्थितीत समक्ष उघडण्यात येतील. कोणतीही एक अगर सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवलेला आहे.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | योजनेचे नाव | निविदा फी | इसारा रक्कम | काम पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | केळवली,वणी,बीडखुर्द प्रा.शाळा शौचलाय दुरुस्ती करणे | २१७३३०/- | १५वा वित्त आयोग अंतर्गत (सन २०२२/२३ व्यतित) | ७०० | २१७३ | ३महिने |
| २ | मौजे बीडखुर्द बौध्दवाडी समाज मंदिराला स्टोअर रूम बांधणे | ९६१६५/- | १५वा वित्त आयोग अंतर्गत (सन २०२२/२३ व्यतित) | ७०० | ९६१ | ३महिने |
| ३ | बीडखुर्द आदिवासीवाडी अंतर्गत गटार बांधणे | ८८०९१/- | १५वा वित्त आयोग अंतर्गत (सन २०२२/२३ व्यतित) | ७०० | ८८० | ३महिने |
| ४ | सार्वजनिक इमारतीमधील शौचालयाची देखभाल दुरुस्ती प्रा.शाळा केळवली वणी बीडखुर्द | १५००००/- | १५वा वित्त आयोग अंतर्गत (सन २०२३/२४ व्यतित) | ७०० | १५०० | ३महिने |
| ५ | केळवली वणी अंगणवाडी पाण्याची टाकी व नळ कनेक्शन देणे | ९३८५८ /- | १५वा वित्त आयोग अंतर्गत (सन २०२२/२३ व्यतित) | ७०० | ९३८ | ३महिने |
| ६ | बीडखुर्द आदिवासी वाडी वैयक्तिक नळ कनेक्शन देणे | १२०००० /- | १५वा वित्त आयोग अंतर्गत (सन २०२२/२३ व्यतित) | ७०० | १२०० | ३महिने |
| ७ | मौजे स्टूल आदिवासी वाडी येथे बोरिंग मारणे व पाणी पुरवठा योजना करणे. | १५००००/- | १५वा वित्त आयोग अंतर्गत (सन २०२२/२३ व्यतित) | ७०० | १५०० | ३महिने |
| ८ | केळवली गाव केळवली आदिवासी वाडी /वांगणी आदिवासी वाडी नळ पाणी पुरवठा योजना दुरुस्ती करणे | ७८८७६/- | १५वा वित्त आयोग अंतर्गत (सन २०२२/२३ व्यतित) | ७०० | ७८८ | ३महिने |
| ९ | वांगणी आदिवासीवाडी सार्व विहीर दुरुस्ती करणे | ८००००/- | १५वा वित्त आयोग अंतर्गत (सन २०२२/२३ व्यतित) | ७०० | ८०० | ३महिने |
| १० | केळवली आदिवासीवाडी सार्व विहीर दुरुस्ती करणे | ९१९२६/- | १५वा वित्त आयोग अंतर्गत (सन २०२२/२३ व्यतित) | ७०० | ९१९ | ३महिने |
| ११ | अमृत सरोवर बीडखुर्द तलाव सुशोभीकरण करणे व गाळ काढणे | १५००००/- | १५वा वित्त आयोग अंतर्गत सन २०२३/२४ व्यतित | ७०० | १५०० | ३महिने |
| १२ | पिण्याचे पाण्याचे विद्यमान स्रोत वाढवणे | २०००००/- | १५वा वित्त आयोग अंतर्गत सन २०२३/२४ व्यतित | ७०० | २००० | ३महिने |

१) कामाचे अंदाजपत्रक व आराखडे ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत ग्रा.पं. मध्ये पहावयास मिळतील.
२) प्राप्त निविदा व दरपत्रक दि. १६/०२/२०२४ रोजी सकाळी ११.३० वा. ग्रुप ग्रामपंचायत कार्यालयात बीडखुर्द येथे मा.सरपंच यांच्या समक्ष उघडण्यात येतील.
३) नोंदणीकृत ठेकेदारांना प्राधान्य देण्यात येईल. निविदाधारकाने निविदा सादर करताना जीएसटी नंबर आधार कार्ड पॅन कार्डची झेरॉक्स जोडणे आवश्यक आहे.
४) प्रत्येक देयकातून शासन नियमाप्रमाणे करांची रक्कम कपात केली जाईल.
५) सदरची कामे अंदाजपत्रकाप्रमाणे मा. गटविकास अधिकारी पंचायत समिती खालापूर व उपअभियंता सो. खालापूर यांजकडील तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली व देखरेखीखाली करावयाची असून काम समाधानकारक नसेल तर ते काम त्याच स्थितीत थांबवून कार्यारंभ आदेश रद्द करण्याचा अधिकार ग्रा.प. ने राखून ठेवले आहेत.
६) कोणतीही एक अथवा सर्व निविदा व दरपत्रक कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार सरपंच ग्रुप ग्रामपंचायत बीडखुर्द यांस राहील.
७) सविस्तर अटी व शर्तीकरीता ग्रामपंचायत कार्यालयाकडे संपर्क साधावा.

सही /- ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत बीडखुर्द, ता.खालापूर जि .रायगड

सही /- सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत बीडखुर्द, ता.खालापूर जि .रायगड

**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

## निविदा सूचना क्रमांक १५७ सन २०२३-२४

खालील कामासाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, मु.पो.ता. महाड, जिल्हा. रायगड पिनकोड नं. ४०२३०१ दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. कोऱ्या निविदा नमुना **दिनांक ०९/०१/२०२४ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक १६/०२/२०२४ रोजी १८.०० वाजे** पर्यंत www.mahapwd.gov.in या संकेत स्थळावरुन ऑनलाईन खरेदी करण्यांत येतील. व दिनांक २०/०२/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता ऑफलाईन पध्दतीने या कार्यालयात सादर कराव्यात व कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, महाड हे भरुन पाठविलेल्या निविदा शक्यतो दिनांक २०/०२/२०२४ रोजी ११.०० वाजता उघडतील. निविदा उघडताना सर्व कंत्राटदारांची उपस्थित रहाने आवश्यक आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखुन ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे पुसाटी ता. तळा नगरपंचायत तळा येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका तळा, जिल्हा रायगड. | ८४४२१७ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| २ | मौजे खर्डी बु. ता. माणगांव, येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | ८४३४१७ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ३ | भांडवली, (ग्रामपंचायत टोल खुर्द), ता. माणगांव येथील गणपती घाटाकडे जाणारा रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | ८५६४३२ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ४ | भांडवली, (ग्रामपंचायत टोल खुर्द), ता.माणगांव येथील स्माशान रोड कॉक्रीटीकरण करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | ८५५४८६ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ५ | रा.मा. ते सडवली रस्ता ग्रा.मा. ११ मध्ये सुधारणा करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. | ८०६४८२ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ६ | वझरवाडी गांव ग्रा.मा. ११६ मध्ये सुधारणा करणे. तालुका पोलादपूर.जिल्हा रायगड. | ८०१८०८ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ७ | खारगांव बु. जोडरस्ता ग्रा.मा. ८६ कि.मी. ०/०० ते ०/५०० मध्ये रस्ता तयार करणे. तालुका म्हासळा, जिल्हा रायगड. | ७६६७३४ | ८००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ८ | आगरवाडा रस्ता ग्रा.मा. ५८ मध्ये रस्ता तयार करणे. तालुका म्हासला, जिल्हा रायगड. | ७६७०६३ | ८००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ९ | ता. महाड ग्रा.पं.सावरट खलई येथे सभामंडप बांधणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. | ७२४६०५ | ८००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| १० | मा. उपविभागीय अभियंता यांच्या निवासस्थानाला आवारभिंत बांधणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. | ६६५६२५ | ७००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ११ | मौजे कुंभार्ते ग्रा.पं.निजामपूर ता. माणगांव येथे सभामंडप बांधणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | ५९६५४८ | ६००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| १२ | मौजे मोरसडे गवळ्याचा कोंड ग्रा.पं. मोरसडे ता. पोलादपूर येथे सभामंडप बांधणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. | ४८८१३९ | ५००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग आठ व वरील |
| १३ | मौजे मोरसडे भगतपेढा ग्रा.पं. मोरसडे ता. पोलादपूर येथे अंतर्गत रस्ता तयार करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. | ४८४९७४ | ५००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग आठ व वरील |

टिप :- १) तपशिलवार निविदा सुचना https//mahapwd.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/
दिनांक : ०८/०२/२०२४
विमाका/कोवि/२०२३-२०२४/३६४

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
महाड (सा.बां.) विभाग, महाड

## निवडक

### मतदान ओळखपत्रांचे वाटप

**पनवेल :** शहरातील शिवाजीनगर वसाहतीमधील



नागरिकांना शिवसेनेतर्फे मतदान ओळखपत्र काढून देण्याचे कार्य करण्यात आले. शिवसेना पनवेल शहर प्रसिद्धीप्रमुख तोफिक बागवान यांच्या प्रयत्नाने व पाठपुराव्याने पनवेल शहरातील शिवाजीनगर वसाहतीमधील नागरिकांना मतदार ओळखपत्र काढून देण्यात आले. त्याचे वाटप पनवेल शहर शाखा येथे करण्यात आले. या कार्यक्रमास पनवेल शहर प्रमुख प्रसाद सोनावणे उपशहर प्रमुख मच्छिंद्र झगडे व अर्जुन परदेशी युवा सेना विभाग प्रमुख अनिकेत जेस्वाल व शिवसैनिक उपस्थित होते.

### नेरूळमध्ये अखंड हरिनाम सप्ताह



**नवी मुंबई :** श्री गणेश सोसायटी संस्थापक अध्यक्ष माजी उपमहापौर अशोक गावडे यांच्या माध्यमातून गेली २४ वर्षे माघी श्री गणेश जयंतीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. दरवर्षी यंदाही अखंड हरिनाम सप्ताहाला सुरुवात झाली असून हभप सुरेश महाराज चांडवेकर यांच्या सुश्राव्य भजनाने सप्ताहास सुरुवात झाली. माजी नगरसेविका सपना गावडे यांनी गणेश पूजन टाळ पखवाद विणा पुजन केले. आठ दिवस हरिपाठ हरि किर्तन असून विभागातील सर्व नागरिकांना यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन अशोक गावडे यांनी केले आहे.

### कामाचे आमिष दाखवून लुटले

**पनवेल :** सोशल मिडीयाच्या माध्यमातून नागरिकांची फसवणूक करण्याच्या प्रकारात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. पनवेलमधील एका तरुणाचीही अशीच फसवणूक झाली आहे. यात टेलिग्राम फ्रॉडच्या या प्रकारातून केतन रघुनाथ पाटील नावाच्या तरुणाची तब्बल १० लाखांची फसवणूक केली आहे. याप्रकरणी नवी मुंबईतील सायबर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. केतन रघुनाथ पाटील (वय ३७) असे पीडित तरुणाचे नाव असून तो पनवेल येथील रहिवासी आहे, याने फिर्याद दिली असून त्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# रस्ता सुरक्षा जनजागृती अभियान

## एपीएमसी वाहतूक शाखेतर्फे हेल्मेट

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

एपीएमसी वाहतूक शाखेच्या वतीने विविध उपक्रम राबवून रस्ता सुरक्षा अभियानादरम्यान जनजागृती करण्यात आली. एपीएमसी वाहतूक शाखेच्या वतीने तुर्भे येथील डॉ.सी.व्ही. सामंत विद्यालयात सहयोग फाउंडेशनच्या सहकार्याने गरजू पालकांना २०० हेल्मेट मोफत वाटण्यात आले.

या वेळी वाहतूक शाखेच्या पोलीस निरीक्षक विमल बिडवे म्हणाल्या की, राज्यासह देशात जे अपघात होतात त्यामध्ये रस्ते वाहतुकीच्या नियमांचे पालन न केल्याने होणारे अपघात अधिक प्रमाणात आहेत. दुचाकी चालवताना हेल्मेट घालणे, अन्य वाहने चालवताना सिटबेल्टचा वापर करणे, सार्वजनिक वाहतूक करणाऱ्या चालकांनी गणवेश, बॅच घालणे, झेब्रा क्रॉसिंग वरूनच पादचाऱ्यांनी रस्ता ओलांडावा आदी वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे, असे आवाहन बिडवे यांनी केले.



तसेच वाहतूक नियमांविषयी जनजागृती करण्यासाठी एपीएमसी विभागात गर्दीच्या ठिकाणी डिस्पले व्हॅन फिरवून प्रबोधन करण्यात आले, अशी माहिती बिडवे यांनी दिली.

## उरण येथे हेल्मेट रॅली

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत उरण येथे बुधवारी (दि. ७) हेल्मेट रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या मोटरसायकल हेल्मेट रॅलीमध्ये महिला व पुरुष अशा ६१ मोटरसायकल स्वार सहभागी झाले होते. रस्ता सुरक्षाही काळाची गरज आहे. जनसामान्यांपर्यंत रस्ता सुरक्षेते विषयी जागरूकता निर्माण व्हावी या उद्देशाने रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येते.

उरण येथील वाढत असलेली वाहनसंख्या पाहाता रस्ता सुरक्षतेविषयी जनजागृती व्हावी यासाठी बुधवारी (दि. ७) मोटरसायकल हेल्मेट रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. उरणमध्ये आयोजित करण्यात



आलेली रॅली केअर पॉईंट नाका, बोकडवीरा, द्रोणगिरी कॉलनी, नवीन शेवा अशी फिरवत केअर पॉईंट येथे सांगता करण्यात आली. या मोटार सायकल हेल्मेट रॅलीमध्ये महिला व पुरुष अशा ६१ मोटरसायकल स्वारांनी सहभाग घेतला होता.

रॅलीला सुरुवात करण्यापूर्वी रस्त्यावरुन येणाऱ्या बिना हेल्मेट वाहन चालविणाऱ्या मोटरसायकल स्वारांना गुलाबाचे फुल देऊन हेल्मेट वापरण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच सर्व वाहन चालकांना रस्ता सुरक्षतेबाबत माहिती देण्यात आली.

या वेळी प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलचे मोटार वाहन निरीक्षक प्रवीण बाबर, विकास मालवे, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक अशोक वारे, महेश माने व त्यांचे सहकारी तसेच श्री एकविरा मोटार ट्रेनिंग स्कूलचे संस्थापक बळीराम ठाकुर, जितेंद्र प्रधान, दानिश मुकरी, प्रितम पाटील आणि वाहन चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे बँकिंग क्षेत्रातील विविध स्पर्धा परीक्षेत यश

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात बँकिंग क्षेत्रातील स्पर्धा परीक्षांच्या पूर्व तयारीसाठी आयबीपीएस, सीए फाउंडेशन व आयसीएआय, सी.एम. ए फाउंडेशन कोचिंग तसेच वेगवेगळे करिअर गायडन्स सत्रे घेतली होती. डिसेंबर २०२३ रोजी घेण्यात आलेल्या सीए फाउंडेशन व सी.एम.ए फाउंडेशन या दोन्ही परीक्षांमध्ये स्वकष्टाच्या जोरावर महाविद्यालयातील अकाउंट व फायनान्स तसेच वाणिज्य विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी घवघवीत यश संपादन केले आहे.



तन्वी गायकवाड (द्वितीय वर्ष वाणिज्य विभाग), अब्दुलक सिद्दिकी (द्वितीय वर्ष वाणिज्य विभाग), राशमीन बालबाले (द्वितीय वर्ष वाणिज्य विभाग), दिनाज तारे, (प्रथम वर्ष काउंट व फायनान्स विभाग) अनिकेत वर्मा (तृतीय वर्ष अकाउंट व फायनान्स विभाग), पार्थ शिंदे (तृतीय वर्ष अकाउंट व फायनान्स विभाग) या सर्वांनी सीए फाउंडेशन या परीक्षेमध्ये तसेच अपूर्वी जयस्वाल (प्रथम वर्ष वाणिज्य विभाग), सानिया होडेकर (प्रथम वर्ष वाणिज्य विभाग) समता सलाटे(प्रथम वर्ष वाणिज्य विभाग) यांनी सीएमए फाउंडेशन या परीक्षेमध्ये घवघवती यश संपादन केले.

प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींचे अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयातील अकाउंट व फायनान्स, तसेच वाणिज्य शाखेतील सर्व प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे या सर्वांनी बँकिंग क्षेत्रातील परीक्षेमध्ये यश संपादन केल्याबद्दल सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## कुटुंबिनी उरण महिला संघातर्फे हळदीकुंकू, सांस्कृतिक कार्यक्रम

**उरण : वार्ताहर**

कुटुंबिनी उरण महिला संघाच्या वतीने महिलांसाठी हळदीकुंकू व सांस्कृतिक कार्यक्रम रविवारी (दि. ४) नानासाहेब धर्माधिकारी उरण नगरपालिका शाळेच्या भव्य पटांगणात झाला.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून ज्येष्ठ मराठी अभिनेत्री सविता मालपेकर, निता महेश बालदी, राष्ट्रवादी काँग्रेस महाराष्ट्र प्रदेश महिला सरचिटणीस भावना घाणेकर, माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, राष्ट्रवादी काँग्रेस उरण तालुका अध्यक्ष हेमांगी पाटील आदी होत्या.

ढोल ताशे, लेझीमच्या गजरात मान्यवरांचे स्वागत झाले.



दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची मधुर सुरूवात दर्शना माळी हिच्या गोड वाणी असली तरीही पहाडी आणि दमदार आवाजात निवेदनास सुरूवात झाली. कुटुंबिनी उरण महिला संघच्या अध्यक्षा श्लोक पाटील यांनी संस्थेचा अहवाल सादर केला. संस्थेच्या संस्थापिका आरती ढोले यांनी आपले मनोगत व्यक्त केले, त्याच प्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेस महाराष्ट्र प्रदेश महिला सरचिटणीस भावना घाणेकर, उरण नगर परिषद माजी नगराध्यक्षा सायली म्हात्रे व प्रमुख पाहुण्या सविता मालपेकर यांनी आपले मनोगते व्यक्त केले.

विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या नारी शक्तीचा सन्मान करण्यात आला. यामध्ये सहा महिलांना गौरवण्यात आले, भाग्यश्री साठे (शैक्षणिक), सरवीन भायजी (व्यावसायिका), सीमा घरत (सामाजिक कार्य), सारिका पाटील (रिक्षाचालक), तृप्ती भोईर (पत्रकार), स्वरांगी जाधव (मिस टिन नवी मुंबई २०२४ गॉडेस ऑफ एलिगन्स) आदी महिलांचा सन्मान करण्यात आला.

या बहारदार कार्यक्रमासाठी कुटुंबिनी महिला संघाच्या संस्था अध्यक्षा श्लोक पाटील, संस्थापिका आरती ढोले, कार्याध्यक्षा दर्शना गावंड, उपाध्यक्ष दीपिका माळी, सचिव नयना धोत्रे, सहसचिव प्रियांका घरत आणि प्रियांका मयेकर, खजिनदार वृषाली पवार, सहखजिनदार निशा म्हात्रे आणि शुभांगी शिंदे, जनसंपर्क अधिकारी प्रिया मयेकर, सल्लागार गायत्री माळी, अवंती साळवी, सदस्या पुर्वी कोशे, कल्पना सुर्वे, प्रिती पाटील, सविता डेरे, संगिता साळुंखे आदींनी विशेष मेहनत घेतली.

त्याचप्रमाणे गौरी देशपांडे, संगीता पवार, निशा शिरधनकर, सीमा घरत, तृप्ती भोईर, गौरी मंत्री, कल्याणी दुखंडे, प्रमिला गाडे, दीपा शिंदे, दिपाली मुकादम, दर्शना शाह आदी महिला सहभागी झाल्या होत्या.

## लैंगिक छळ प्रतिबंध कायद्याविषयी मार्गदर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**

स्त्री शक्तीची ताकद मोठी असून महिलांनी आपले वर्तुळ आता स्वतःच आखायचे असून खंबीरपणे नाही म्हणायला शिकायचे आहे असे सांगत जिल्हा न्यायाधीश एस. एस. जैन यांनी कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंधात्मक कायदा २०१३ मधील मार्गदर्शक तत्वांबाबत सुसंवाद साधला.

नवी मुंबई महापालिका मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात तालुका विधी सेवा समिती तथा जिल्हा न्यायाधीश एक कार्यालयाच्या वतीने आयोजित कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंधात्मक कायदा २०१३ बाबत जनजागृतीपर मार्गदर्शन शिबिरावेळी त्या आपले मनोगत व्यक्त करीत होत्या. या वेळी नमुंमपा अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले, विधी विभागाचे विभाग प्रमुख उपायुक्त दिलीप नेरकर, भांडार विभागाच्या उपायुक्त मंगला माळवे, महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, शिक्षण अधिकारी अरुणा यादव, सहा. आरोग्य अधिकारी डॉ. रत्नप्रभा चव्हाण आदी उपस्थित होते.

राजस्थान राज्यातील भैरवीदेवी प्रकरणाच्या अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयाने निकालात दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कायद्याची माहिती देत न्यायाधीश एस एस जैन यांनी या संवेदनशील विषयाबाबत महत्वाची माहिती दिली. त्याचप्रमाणे https://shebox.nic.in या संकेतस्थळावर सहजपणे तक्रार करता येवु शकते असेही त्यांनी सांगितले.

## स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान

### पनवेल मनपातर्फे पथनाट्य, रांगोळी स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेमार्फत स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारीपर्यंत राबविण्यात येत आहेत. आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली या पंधरवड्यात कुष्ठरोगाविषयी आरोग्य शिक्षणाचे विविध कार्यक्रम राबविण्यास सुरुवात झाली आहे. या अभियानांतर्गत ३ जानेवारी रोजी कुष्ठरोगाच्या जनजागृतीसाठी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५ खारघर व खारघर रेल्वे स्थानकांवरती पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. तसेच ७ जानेवारी रोजी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ६,१४,१५ याठिकाणी 'स्पर्श' अभियानांवर आधारित रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

कुष्ठरोगाचे समुळ उच्चाटन करण्यासाठी महापालिकेचा वैद्यकिय आरोग्य विभाग सर्वतोपरी प्रयत्नशील आहे. या अभियानांतर्गत आपआपल्या स्तरावर प्रत्येक नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये विविध उपक्रम राबविले जात आहेत. या जनजागृती कार्यक्रमांतर्गत ३ जानेवारी रोजी कुष्ठरोगाच्या जनजागृतीसाठी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५ खारघर व खारघर रेल्वे स्थानकांवरती पथनाट्याचे सादरी करण करण्यात आले. तसेच दिनांक ७ जानेवारी रोजी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ६,१४,१५ याठिकाणी 'स्पर्श' अभियानांवर आधारित रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्ताने ३० जानेवारी रोजी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरती कुष्ठरोग निवारण पंधरवडा साजरा करण्याबाबत केंद्र शासनाने निर्देश दिले आहेत. त्यानूसार मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी व सहाय्यक संचालक आरोग्य सेवा डॉ. प्रताप शिंदे यांच्या सूचनेनूसार येत्या १५ दिवसांत कुष्ठरोग जनजागृतीपर विविध कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. महापालिका आणि सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग) अलिबाग रायगड यांच्या संयुक्त विद्यमानातून हे कार्यक्रम होत आहेत.

नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५ येथे सर्व आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांची जनजागृतीपर मॅरेथॉन व कार्यशाळा होणार आहे. 'स्पर्श' कुष्ठरोग जनजागृती अभियानांतर्गत महापालिकेच्या वतीने डॉ. वैभवी निंबाळकर आणि उपजिल्हा रुग्णालयाच्यावतीने अर्जुन ठाकूर सर्व कार्यक्रमाचे नियोजन करत आहेत.



## ठेवी संकलनात 'बीओएम' अव्वल

**पनवेल :** तिसऱ्या तिमाहीत सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये बँक ऑफ महाराष्ट्रने (बीओएम) १७.८९ टक्के ठेवी संकलन करून अव्वल क्रमांक पटकावला असून भारतीय स्टेट बँक १२.८४% संकलन करून दुसऱ्या क्रमांका वर आहे. बहुतांश वित्तीय संस्थांना दोन अंकी वाढ साध्य करण्यात अडचणी येत असताना बँक ऑफ महाराष्ट्रने सार्वजनिक क्षेत्रातील वित्तीय संस्थांमध्ये ठेवी संकलन करण्याच्या बाबतीत सर्वाधिक वाढ नोंदवली आहे. सार्वजनिक क्षेत्रातील १२ बँकांपैकी फक्त बँक ऑफ महाराष्ट्र आणि भारतीय स्टेट बँक या दोनच बँका डिसेंबर २०२३ मध्ये संपलेल्या तिसऱ्या तिमाहीत ठेवीं संकलनामध्ये दुहेरी अंकी वाढ नोंदवू शकले. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या प्रकाशित त्रैमासिक आकडयांनुसार, या तिमाहीत बँक ऑफ महाराष्ट्रने ठेवींमध्ये १७.८९ टक्के वाढ नोंदवली आहे.

## उरण तहसीलदारांच्या हस्ते सहा बोटींचे वाटप

**उरण : प्रतिनिधी**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण तर्फे विंधणे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील कातकरी आदिवासी बांधवांना मच्छीमारीसाठी सहाबोटींचे वाटप उरणचे तहसीलदार डॉ. उध्दव कदम यांच्या हस्ते बुधवारी (दि. ७) करण्यात आले.

कठंवली गावातील सामाजिक कार्यकर्ते नामदेव ठाकूर यांच्या प्रयत्नामुळे आदिवासी बांधवांना मच्छीमारीसाठी सहा बोटी प्राप्त झाल्याने त्यांचे व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेणच्या प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरसन यांचे लाभार्थी आदिवासी बांधवांनी या कार्यक्रमाचे औचित्य साधून आभार व्यक्त केले आहे.



उरण तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते नामदेव ठाकूर, राजेंद्र मढवी, बी.एम ठाकूर हे विविध वाड्यातील आदिवासी बांधवांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर सातत्याने प्रयत्न करत आहेत. तरी आदिवासी बांधवांनी शासन राबवित असलेल्या शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे. तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण तर्फे प्राप्त झालेल्या बोटींचा वापर हा आपल्या उदरनिर्वाहासाठी करावा अशा सूचना उरणचे तहसीलदार डॉ. उध्दव कदम यांनी या वेळी केल्या आहेत.

या वेळी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेणचे अधिकारी सुहास साळसकर, विंधणे ग्रुपग्रामपंचायतीच्या सरपंच निसर्गा रोशन बाकी, सामाजिक कार्यकर्ते बी.एम. ठाकूर, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र मढवी, ज्ञानप्रकाश पाटील, सामाजिक कार्यकर्ते नामदेव ठाकूर, लाभार्थी आदिवासी बांधव नितीन अनंत कातकरी, देवीदास कातकरी, रवि कातकरी, दीपक कातकरी, सुनील कातकरी, संजय कातकरीसह आदिवासी बांधव उपस्थित होते.

(छाया : श्रीनिवास काजरेकर)



पनवेल : सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघाच्या वतीने हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

# जावळी येथे २५ हेक्टर क्षेत्र जळून खाक

## वणव्यामुळे जैवविविधता धोक्यात; वनविभागाचे दुर्लक्ष


(छाया : इजाज मनियार)

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील जंगल भागात आग लावण्याच्या प्रमाणात वाढ झाली असून यामुळे डोंगरच्या डोंगर आगीच्या भक्ष्यस्थानी पडत आहेत. यामध्ये वनसंपदेची प्रचंड हानी होत असल्याने येथील जैवविविधता धोक्यात आली आहे, परंतु याकडे वनखात्याचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसत आहे. जावळी येथील वनविभागाच्या हद्दीत तीन दिवसांपूर्वी लागलेल्या आगीत वनविभागाकडून लावलेल्या २५ हेक्टर क्षेत्रातील अनेक झाडे जळून खाक झाली.

आगीची माहिती समजताच ग्रामस्थांनी आग विझवण्याचे अनेक प्रयत्न केले. वनविभागाच्या अधिकाऱ्यांना दूरध्वनीवरून माहिती देण्यात आली, परंतु आग इतकी भीषण होती की, अनेक झाडे आगीच्या भक्ष्यस्थानी सापडली. काही झाडे वाचवण्यात ग्रामस्थांना यश आले.

सध्या औद्योगिकरण व नागरिकरणाच्या नावाखाली जंगले भुईसपाट होताना दिसत आहेत. त्यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडले आहे. त्यातच ठिकठिकाणी लावल्या जाणाऱ्या आगींमुळे वनसंपदेचा ऱ्हास होत आहे.

जंगलात आग लावण्यावर कुणाचाही अंकुश नसल्याने व कायद्याचा धाक नसल्याने बिनधास्तपणे जंगलात आग लावली जाते, असा आरोप ग्रामस्थांमधून केला जात आहे.

या प्रकारणी कसून चौकशी चालू असून लवकरच आग लावणाऱ्या विरोधात फौजदारी खटला भरण्यात येणार आहे, अशी माहिती वनविभाग अधिकारी कुलदीप पाटकर यांनी दिली.

# पोलादपूर नगरपंचायतीच्या सभापतींची निवड



**पोलादपूर : प्रतिनिधी**

नगरपंचायतीच्या विषय समिती सभापतीपदाची निवड करण्यात आली.

सार्वजनिक बांधकाम सभापती सुनीता पार्टे तर सदस्य विनायक दिक्षित, सुरेश पवार, दिलीप भागवत, निखिल कापडेकर; पाणीपुरवठा सभापती प्रसाद इंगवले, सदस्य सिद्धश शेठ, मनोज प्रजापती, स्वप्नील भुवड, आशा गायकवाड; नियोजन, अर्थ, शिक्षण, क्रीडा सभापती अंकिता जांभळेकर, सदस्य विनायक दिक्षित, सुरेश पवार, आशा गायकवाड, संतोष चव्हाण; आरोग्य व मालमत्ताकर सभापती नागेश पवार, सदस्य मनोज प्रजापती, स्वप्नील भुवड, श्रावणी शहा; महिला व बालकल्याण सभापती अस्मिता पवार, शिल्पा दरेकर, तेजश्री गरूड तर स्थायी समिती सभापती नगराध्यक्ष सोनाली गायकवाड, सदस्य उपनगराध्यक्ष नागेश पवार, सुनीता पार्टे, प्रसाद इंगावले यांची वर्णी लागली आहे.

# खोपोली विहारी येथे चायनीजच्या दुकानाला आग

**खोपोली : प्रतिनिधी**

रेल्वे स्टेशनजवळील विहारी गावातील पवार यांच्या चायनीज व बिर्याणीच्या छोट्या हॉटेलला आग लागल्याची घटना बुधवारी (दि. ७) दुपारी १२ वा.च्या दरम्यान घडली. या आगीत हॉटेलमधील सामानाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्याचबरोबर एक जण भाजल्याने जखमी झाल्याची माहिती मिळत आहे.

बिर्याणी बनवीत असताना गॅस सिलेंडरला गळती लागल्याने ही आग लागल्याची प्राथमिक माहिती स्थानिकांकडून मिळत आहे. काही क्षणातच आगीने रुद्र रूप धारण केले. अग्निशामक अग्निशामक दलाला पाचारण करण्यात आले.

अग्निशामक दलाचे मोहन मोरे व सहकार्याने अर्ध्या तासातच आग विझवली. या हॉटेलच्या मागे मालकाचे कुटुंब राहत आहेत, तसेच त्या हॉटेल शेजारीच महावितरणचा ट्रान्सफॉर्मर आहे. जर ट्रान्सफॉर्मरला आग लागली असती तर, मोठे नुकसान झाले असते.




# सुधागड तालुक्यातील कोडबेवाडीला मिळणार रस्ता

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील ताडगाव ग्रामपंचायतीमधील कोडबेवाडी आदिवासीवाडीमध्ये पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत प्रथमच ताडगाव ते कोडबेवाडी हा रस्ता होणार आहे. नुकतेच या रस्त्याचा सर्व्हे करण्यात आला. त्यामुळे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

या रस्त्याचा सर्व्हे करताना गावचे दत्तात्रेय देशमुख, माजी सरपंच छब्या जाधव व केतन साठे उपस्थित होते. ताडगाव ग्रामपंचायत सरपंच करुणा साठे, उपसरपंच संजय चौधरी, सदस्य मंगेश देशमुख, अनंत धायगुडे, अरुणा वारगुडे, विठी जाधव, मिनी खताळ, देवकी वाघमारे आणि सर्व ग्रामस्थांनी रस्ता होणार म्हणून आनंद व्यक्त केला आहे. या रत्स्याचे काम येत्या मे महिन्याच्या आत पूर्ण करण्यासाठी ग्रामपंचायत प्रयत्नशील असून यासाठी पाठपुरावा करू, असे सरपंच करुणा साठे यांनी सांगितले.



आमदार रवीशेठ पाटील, माजी आमदार धैर्यशील पाटील, माजी जि. प. सदस्य रवींद्र देशमुख, अधिकाऱ्यांचे येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन साठे यांनी आभार मानले.

# आदेश देऊनही पाणी योजनेचे काम नाही

## निडी तर्फे अष्टमी ग्रामस्थांची पंचायत समितीवर धडक

**धाटाव : प्रतिनिधी**

यावर्षी पाऊस कमी झाल्याने अनेक गावांना पाणीटंचाईचा सामना करावा लागणार आहे. रोहा तालुक्यातील निडी तर्फे अष्टमी गावासाठी जलजीवन योजनेच्या माध्यमातून पाणीयोजना मंजूर झाली असून घरोघरी नळ कनेक्शन देण्यासाठी ऑक्टोबर २०२३मध्ये कार्यारंभ आदेशदेखील देण्यात आले आहेत, परंतु अद्यापही कामाला सुरुवात झाली नसल्याने निडीतर्फे अष्टमी गावातील ग्रामस्थांनी पंचायत समितीच्या कार्यालयात भेट देऊन आपले गाऱ्हाणे मांडले आहे.

निडी तर्फे अष्टमी गावासाठी पहिल्या टप्प्यात जलजीवन मिशन योजनेच्या माध्यमातून नळपाणी योजना मंजूर झाली असून त्यामध्ये समाविष्ट कामे पूर्ण झाल्याने ग्रामपंचायतीने काम पूर्णत्वाचे दाखले दिले असून बिलदेखील संबंधित ठेकेदाराला देण्यात आले आहे. मूळ योजनेत विहीर, पंप हाऊस व नवीन पंप यांचा समावेश होता, तर योजनेतील उर्वरित कामे करण्यासाठी १५वा वित्त आयोगाच्या निधीतून सन २०२०-२१मध्ये



अंतर्गत नळजोडणी साठी १,९७,००० रुपये, जुनी पाईपलाईन दुरुस्तीसाठी सन २०२१-२२मध्ये १,२०,००० रुपये, तर पाणी साठवण टाकी दुरुस्तीसाठी सन २०२२-२३मध्ये ९० हजार व जुन्या पंपाच्या दुरुस्तीसाठी ४० हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

ही कामे लवकरात लवकर पूर्ण व्हावीत यासाठी ग्रामस्थांनी स्वतः पाठपुरावा करून कामाची अंदाजपत्रके ग्रामपंचायत कार्यालयात नेऊन दिली, तरीदेखील ग्रामपंचायत काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करत नसल्याने संतप्त ग्रामस्थांनी पंचायत समिती कार्यालयात धडक देत आपली व्यथा मांडली आहे.

याबाबत सरपंच अक्षरा डोलकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी मूळ ठेकेदाराने ५१ जोडण्या दिल्या नसल्याचे सांगितले, तसेच मी पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून तुम्हाला माहिती देते, असे सांगितले. ग्रामसेवक शिद यांच्याशी संपर्क साधला असता, मी नुकताच या ग्रामपंचायतीचा कार्यभार स्वीकारला असून माहिती घेऊन सांगतो, असे सांगितले आहे.



# खालापूर वावंढळ ग्रामपंचायतीतर्फे दिव्यांगांना निधीचे वाटप

**चौक** : खालापूर तालुक्यातील ग्रामपंचायत वावंढळकडून दिव्यांग लाभार्थी यांना निधीचे वाटप करण्यात आले आहे. लाभार्थ्यांकडून प्रमाणपत्र घेण्यात आली होती. या वेळी सरपंच सुहास कदम, सेवानिवृत्त अधिकारी विलास कदम, समाजसेवक रामदास काईनकर, पत्रकार अर्जुन कदम, यशवंत मुळे, उपसरपंच अमोल कदम, सदस्य मांडवकर, ललिता काईनकर यांच्यासह लाभार्थी आणि ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामसेविका मंगला केदारे यांनी आभार मानले. कर्मचारी यशवंत कदम, संदीप पानपाटील, सावंत यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पेण एज्युकेशनच्या आवारात भरला विद्यार्थ्यांचा आठवडा बाजार



**पेण : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना बाहेरील व्यवहाराचे ज्ञान व्हावे, खरेदी-विक्री याबाबत माहिती मिळावी या उद्देशाने पेण एज्युकेशन सोसायटीच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी आठवडा बाजार भरविण्यात आला होता.

या आठवडा बाजाराचे उद्घाटन पेण एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष ॲड. बापूसाहेब नेने, माजी कार्याध्यक्ष वसंत आठवले, उपकार्याध्यक्ष व खजिनदार संजय कडू, सेक्रेटरी सुधीर जोशी मुख्याध्यापिका लेखा ठाकूर, शिक्षक पालक संघाच्या उपाध्यक्ष आरती गावंड, रोहिणी म्हात्रे, गंगाराम गायकवाड, शाळा व्यवस्थापन समिती व पालक सदस्य आदी उपस्थित होते.

ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी 'भाजी घ्या भाजी, काकडी गाजर कांदे, बटाटे, ज्वेलरी, खाद्य पदार्थ, फळभाज्या, पालेभाज्या विविध रंगाची फुले घ्या, पाणीपुरी, चटकदार भेळ, गरम बटाटेवडा या आवाजाने जणू शाळेच्या प्रांगणात खरोखरच आठवडा बाजार भरल्याचे चित्र दिसून आले.

पालक व शालेय मुलांचा ग्रामस्थांचा खरेदीसाठी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने विद्यार्थ्यांचे चेहरे प्रफुल्लित झाले होते.

या वेळी विविध ५१ स्टॉल विद्यार्थ्यांनी उभारले होते. या वेळी पहिली ते चौथीचे पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**महाराष्ट्र शासन**

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

**निविदा सूचना क्रमांक १४७ सन २०२३-२४**

कार्यकारी अभियंता, महाड (सा. बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन - ४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | चिखलप दांडगुरी रस्ता प्रजिमा ५७ किमी ०/०० ते १/०० व ३/४०० ते ६/ ४०० १०/००ते१०/४०० मध्ये सुधारणा करणे. ता. श्रीवर्धन, जि.रायगड (३.७५ मी. चे ५०५० मी. मध्ये रुंदीकरण करणे) | २,४७,४९,९७८/- | १,५०,०००/- | ११८०/- | १२ महिने | आवश्यक नाही |
| २ | श्रीवर्धन म्हसळा लोणेरे रस्ता रामा ९९ किमी १६/५०० ते १७/०० मध्ये रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे ता. म्हसळा, जि. रायगड. | २,४७,४९,९५६/- | १,५०,०००/- | ११८०/- | १२ महिने | आवश्यक नाही |
| ३ | कुडगाव हरवित तुरुंबाडी रस्ता प्रजिमा ५८ किमी ११/०० ते १५/५०० मध्ये सुधारणा करणे ता. म्हसळा, जि. रायगड (३.७५ मी. चे ५०५० मी. मध्ये रुंदीकरण करणे | २,४७,४९,३३७/- | १,५०,०००/- | ११८०/- | १२ महिने | आवश्यक नाही |
| ४ | म्हसळा कोइरी रस्ता प्रजिमा ७२ किमी ०/०० ते ६/५०० ची सुधारणा करणे ता. म्हसळा, जि. रायगड (३.७५ मी चे ५.५० मी मध्ये रुद्रीकरण करणे) | २,४६,०५,९९३/- | १,५०,०००/- | ११८०/- | १२ महिने | आवश्यक नाही |
| ५ | बागमांडला आंबेत टोळ वीर रस्ता रामा १०० किमी १६/८०० ते २१/०० मध्ये रस्त्याची सुधारणा करणे ता. श्रीवर्धन, जि. रायगड. | २,२७,५४,८१७/- | १,५०,०००/- | ११८०/- | १२ महिने | आवश्यक नाही |
| ६ | देहेन पाष्टी पांगळोली रस्ता प्रजिमा ७६ किमी ०/०० ते ४/०० मध्ये सुधारणा करणे ता. म्हसळा, जि. रायगड (३.७५ मी चे ५०५० मी मध्ये रुंदीकरण करणे) | २,२४,९९,९४६/- | १,५०,०००/- | ११८०/- | १२ महिने | आवश्यक नाही |
| ७ | श्रीवर्धन वाळवटी रस्ता प्रजिमा ५६ किमी ०/६०० ते ३/४०० मध्ये सुधारणा करणे ता. श्रीवर्धन, जि. रायगड | २,२४,९९,८३२/- | १,५०,०००/- | ११८०/- | १२ महिने | आवश्यक नाही |
| ८ | म्हसळा मांदाड रस्ता रामा ९६ किमी ९/५०० ते १३/६०० मध्ये सुधारणा करणे ता. म्हसळा, जि. रायगड | २,०२,४९,९४१/- | १,५०,०००/- | ११८०/- | १२ महिने | आवश्यक नाही |
| ९ | अलिबाग रोहा कणघर वावे रस्ता रामा ९१ किमी ९९/०० ते १०२/०० मध्ये सुधारणा करणे ता. म्हसळा, जि. रायगड | १,९८,८९,८३१/- | १,५०,०००/- | ११८०/- | १२ महिने | आवश्यक नाही |
| १० | देहेन पाष्टी पांगळोली रस्ता प्रजिमा ७६ किमी ५/०० ते /८/५०० मध्ये सुधारणा करणे ता. म्हसळा, जि. रायगड | १,९७,९९,९७२/- | १,५०,०००/- | ११८०/- | १२ महिने | आवश्यक नाही |
| ११ | वडशेत वावे कोंडे तर्फे श्रीवर्धन ते प्रतिमा ७३ मार्ग तयार करणे प्रा मा २६ ता. श्रीवर्धन जि. रायगड | १,७९,९९,१७५/- | १,५०,०००/- | ११८०/- | १२ महिने | आवश्यक नाही |
| १२ | नेवरुळ कोकबल सांगवड रस्ता प्रजिमा ७५ किमी. ०/०० ते ३/०० ची सुधारणा करणे ता. म्हसळा, जि, रायगड | १,६१,९९,९९०/- | १,५०,०००/- | ११८०/- | १२ महिने | आवश्यक नाही |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **०५/०२/२०२४ (सकाळी १०.०० पासून)** ते दिनांक **१९/०२/२०२४ वेळ १८.००** वाजेपर्यंत |
| २ | निविदापूर्व बैठक | अधिक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक ०८.०२.२०२४ वेळ १२.०० वाजता |
| ३ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक **२१/०२/२०२४** वेळ १२.०० वाजता |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/५८१**
**दिनांक : ०२/०२/२०२४**

**सही/**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, मौजे भिंगारवाडी, ता. पनवेल, जि. रायगड येथील श्री. अनिल कृष्णा पाटील व इतर यांचे नावे महसूल अभिलेखात असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाच्या शेतजमिन मिळकती आहेत. सदर मिळकतीचे स्वामित्व (Title) तपासणेकामी खालील शेतजमीन मिळकतींची जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे भिंगारवाडी, तालुका. पनवेल, जि. रायगड.**

| कब्जेदाराचे नाव | गट नं. सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| प्रमोद दशरथ घरत, अनिल कृष्णा घरत, रामचंद्र बारशा घरत | ८ | २ | ०-५२-४० पो.ख.०-०६-३० एकुण ०-५८-७० | ६.१९ |
| | १३ | २ | ०-१७-४० पो.ख.०-०१-३० एकुण ०-१८-७० | २.१३ |
| | १३ | ३ | ०-०६-८० | ०.५३ |
| | १३ | ४ | ०-२१-०० | ०.८१ |
| | १४ | ० | ०-१४-०० | ०.३७ |
| | १७ | १ | ०-१२-२० पो.ख.०-०१-०० एकुण ०-१३-२० | ०.३३ |
| | १७ | २ | ०-०४-५० | ०.५३ |
| | २१ | ० | ०-२६-६० | ०.८१ |
| | ६० | १ | ०-८०-५० पो.ख. ०-२१-५० एकुण १-०२-०० पैकी ०-५१-०० | ९.७७ |
| | ६० | २ | ०-२६-०० पो.ख. ०-०२-०० एकुण ०-२८-०० | ०.६९ |
| | ६० | ३ | ०-०९-१० पो.ख. ०-०५-३० एकुण ०-१४-४० | १.५० |
| | ६० | ४ | ०-०७-३० पो.ख. ०-००-८० एकुण ०-०८-१० | १.०० |
| | ६२ | ० | ०-१८-०० पो.ख. ०-१२-०० एकुण ०-३०-०० | ०.३७ |
| | ६३ | २ | १-०६-०० पो.ख. ०-२०-८० एकुण १-२६-८० पैकी ०-८०-०० | ११.१२ |
| | ६३ | ३ | ०-०३-०० पो.ख. ०-००-५० एकुण ०-०३-५० | ०.२२ |
| | ६४ | ० | ०-४०-०० पो.ख. ०-०९-०० एकुण ०-४९-०० | ०.७८ |
| | ७२ | २ | ०-११-६० पो.ख. ०-०१-०० एकुण ०-१२-०० | ०.२२ |
| | ७३ | ० | ०-०६-०० पो.ख. ०-०३-०० एकुण ०-०९-०० | ०.१६ |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतींवर, वा मिळकतींच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारच्या हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यु.वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाच्या आत हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तकार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तकार, दावा हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतींचे स्वामित्वाचा तपशील आमचे अशिलांस देऊ व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तकारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी/नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : ०८/०२/२०२४

सही /-
विजय भगत ॲन्ड असोशिएटस्
(ॲडव्होकेट ॲन्ड लिगल कन्सलटंट)

शॉप नं. १२८, नगरपालीका शॉपींग कॉम्प्लेक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. मो. ९८२०६०७५७२ / ९३२२६५२३१९
Email - vijaybhagat43@gmail.com

# तिसऱ्या कसोटीत दोन खेळाडू पुनरागमन करण्याची शक्यता

**राजकोट : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड यांच्यात पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळली जात आहे. दोन्ही संघांनी प्रत्येकी एक सामना जिंकला आहे. आता या मालिकेतील तिसरा सामना राजकोटमध्ये १५ फेब्रुवारीपासून खेळला जाणार आहे. या सामन्यापूर्वी भारतीय संघाला पुढील तीन कसोटी सामन्यांसाठी टीम इंडियाचा संघ जाहीर करायचा आहे. यासंदर्भात काही माहिती समोर आली आहे. पुढील सामन्यात भारताचे दोन दिग्गज खेळाडू पुनरागमन करणार आहेत. त्याचबरोबर दोन खेळाडू संघातून बाहेर जाऊ शकतात.

बीसीसीआयच्या सूत्राने सांगितले की, पुढील सामन्यात दोन खेळाडू परतणार आहेत, जे दुसरा कसोटी

## दोन खेळाडू होणार संघातून बाहेर





सामना खेळले नव्हते. याशिवाय दोन स्टार खेळाडू तिसरा कसोटी सामना खेळताना दिसणार नाहीत, पण विराट कोहलीबद्दल एक अपडेट आली आहे की, तो पुढील दोन सामन्यांमधूनही बाहेर राहू शकतो. विराट तिसऱ्या कसोटीत पुनरागमन करू शकेल, अशी अटकळ बांधली जात होती. आता बातम्या येत आहेत की, तो पाचव्या कसोटी सामन्यात पुनरागमन करू शकतो. त्याआधी या अनुभवी खेळाडूसाठी संघात पुनरागमन करणे कठीण आहे.

त्याचवेळी भारताचा अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजा अजूनही दुखापतीतून सावरलेला नाही. त्यामुळे तो पुढील सामन्यातूनही बाहेर जाणार आहे. पहिल्या कसोटी सामन्यात धाव घेताना जडेजाला दुखापत झाली होती.

भारताचा यष्टीरक्षक फलंदाज केएल राहुल पुढील सामन्यात पुनरागमन करणार आहे. राहुलच्या बोटाला दुखापत झाली होती. त्यामुळे तो दुसऱ्या कसोटी सामन्यातून बाहेर पडला होता. जसप्रीत बुमराहला तिसऱ्या कसोटीत विश्रांती दिली जाईल अशी बातमी होती, पण बीसीसीआयच्या सूत्राने सांगितले की, बुमराह पुढील कसोटी सामनाही खेळताना दिसणार आहे.

दुसऱ्या कसोटीत भारताचा स्टार फलंदाज मोहम्मद सिराजला विश्रांती देण्यात आली होती. त्याच्या जागी मुकेश कुमारचा संघात समावेश करण्यात आला, मात्र मुकेश आपल्या कामगिरीने प्रभावित करू शकला नाही. त्यामुळे त्याला तिसऱ्या कसोटीतून वगळण्यात येणार आहे. त्याच्या जागी सिराजचा पुन्हा एकदा संघात येणार आहे.

# पाकला नमवून ऑस्ट्रेलिया फायनलमध्ये

## अंडर १९ वर्ल्डकपमध्ये भारतासोबत रविवारी महालढत

**बेनोई : वृत्तसंस्था**

शेवटच्या षटकापर्यंत रंगलेल्या चुरशीच्या मुकाबल्यात ऑस्ट्रेलियाने निसटता विजय मिळवत १९ वर्षाखालील विश्वचषक स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. येत्या रविवारी (दि.११) त्यांच्यासमोर गतविजेत्या भारताचे आव्हान असेल. बेनोई इथे झालेल्या सेमीफायनलच्या लढतीत १८० धावांचे आव्हान पेलताना ऑस्ट्रेलियाची दमछाक झाली आणि त्याने एका विकेटने विजय मिळवला.

स्पर्धेत भेदक गोलंदाजी करणाऱ्या पाकिस्तानसमोर ऑस्ट्रेलियाची अवस्था बिकट झाली होती, पण रॅफ मॅकमिलनने नाबाद १९ धावा करीत संघाला संस्मरणीय विजय मिळवून दिला. पाकिस्तानतर्फे अली रझाने चार, तर मिन्हासने दोन विकेट्स घेतल्या.

ऑस्ट्रेलियाकडून सलामीला येऊन खेळपट्टीवर ठाण मांडलेल्या हॅरी डिक्सनने अर्धशतक पूर्ण केले. पण त्याला धावांसाठी संघर्ष करावा लागला. अर्धशतकानंतर लगेचच तो बाद झाला. त्याने ७५ चेंडूंत पाच चौकारांसह ५० धावांची खेळी केली. खेळपट्टीवर स्थिरावलेला हॅरी बाद होणे ऑस्ट्रेलियासाठी मोठा धक्का होता. टॉम कॅम्पबेल आणि ऑलिव्हर पिईक यांनी सहाव्या विकेटसाठी ४४ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. सामन्याचे पारडे ऑस्ट्रेलियाच्या दिशेने झुकलंय असे वाटत असतानाच कॅम्पबेल बाद झाला. मग ऑलिव्हरने



रॅफ मॅकमिलनला हाताशी घेत किल्ला लढवला. ऑलिव्हरने ४९ धावांची संयमी खेळी केली.

गोलंदाजी करताना सहा विकेट्स पटकावणाऱ्या टॉम स्ट्रेकरला आणि त्याच षटकात माहली बिअर्डमनला बाद करीत अली रझाने सामन्याचे पारडे पाकिस्तानच्या बाजूने झुकवले, पण मॅकमिलनने संयमी खेळ करीत 'कांगारूं'ना विजय मिळवून दिला.

# 'त्या' दिवशी क्रिकेटमधून निवृत्त होईन -शमी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघाचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी वनडे वर्ल्डकपपासून विशेष चर्चेत आहे. वर्ल्डकपमध्ये त्याने सर्वांत कमी सामने खेळले, पण तरीही त्याला सर्वाधिक २४ बळी मिळाले. त्याच्या भेदक माऱ्याने भलेभले फलंदाज ढेपाळले. सध्या शमी दुखापतीमुळे विश्रांती घेत आहे. घोट्याच्या दुखापतीने तो त्रस्त आहे. त्यामुळे तो इंग्लंडविरुद्धच्या घरच्या कसोटी मालिकेतूनही बाहेर आहे. याच दरम्यान शमीने क्रिकेटमधून निवृत्तीबाबत मोठे वक्तव्य केले आहे.

शमीच्या घोटयाच्या दुखापतीमुळे झालेली इजा कितपत गंभीर आहे आणि त्यातून शमी कधी बरा होणार याबाबत सध्या फारशी स्पष्टता



नाही, पण सध्या या दुखापतीमुळे शमी भारतीय संघाबाहेर आहे. अशा परिस्थितीत तो निवृत्ती घेणार का, असा सवाल वारंवार विचारला जातो. त्यावर शमीने 'नेटवर्क१९'ला रोखठोक उत्तर दिले, ज्या दिवशी मला क्रिकेटचा कंटाळा येईल, तेव्हाच मी स्वतःच ते सोडण्याचा निर्णय घेईन. मला कशाचाही विचार करून डोक्यावरचं ओझं वाढवायचं नाही. मला कुणीही समजावून सांगणारा माणूस नाही. माझ्या कुटुंबातील कोणीही मला काहीही सांगत नाही. त्यामुळे एखाद्या दिवशी मी सकाळी उठलो आणि मला वाटले की मला कंटाळा आला आहे तर त्याच दिवशी मी स्वतः ट्वीट करेन की मी क्रिकेटमधून निवृत्ती घेत आहे.

दरम्यान, शमीचा बायोपिक येणार असल्याच्या बातम्याही आल्या आहेत, मात्र यात कोण कोण असेल याचा खुलासा झालेला नाही, पण आता शमीनेच त्याच्या बायोपिकच्या प्रश्नावर उत्तर दिले आहे. तो म्हणाला, हो, माझा बायोपिक येणार आहे असे मीपण ऐकले आहे. जर त्यातला अभिनेता फायनल झाला नसेल तर क्रिकेट सोडल्यानंतर मीच माझ्याच बायोपिकमध्ये स्वतःची काम करेन.

# सनरायझर्स संघ अंतिम फेरीत

**केपटाऊन : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिका टी-२० लीगचा दुसरा हंगाम आता अंतिम टप्प्यात पोहचला आहे. स्पर्धेतील पहिल्या क्वालिफायर सामन्यात एडन मार्करमच्या नेतृत्वाखालील सनरायझर्स इस्टर्न केप संघाने डरबन सुपर जायंट्सचा ५१ धावांनी पराभव केला. यासह मार्करमच्या संघाने सलग दुसऱ्यांदा अंतिम फेरी गाठली.

सनरायझर्स इस्टर्न केप आणि डर्बन सुपर जायंट्स यांच्यातील क्वालिफायर-१ सामना खेळला गेला. या सामन्यात सनरायझर्सने प्रथम फलंदाजी करताना आठ गडी गमावून १५७ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात सुपर जायंट्स संघ १९.३ षटकांत केवळ १०६ धावांवरच मर्यादित राहिला.

# ऐतिहासिक कामगिरीनंतर बुमराहची इन्स्टा स्टोरी चर्चेत

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने कसोटी सामन्यातील गोलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थान पटकाविले. टीकाकारांना शांततेत चपराक लगावल्यावर आता बुमराहची एक इन्स्टाग्राम स्टोरी चर्चेत आहे.

बुमराहने भारतीय संघाला दुसऱ्या कसोटीत इंग्लंडविरुद्ध विजय मिळवून देत मालिका १-१ अशी समान पातळीवर आणण्यात मोठे योगदान दिले. विराट कोहलीच्या अनुपस्थितीत संघाला विजय मिळवून दिल्यानंतर बुमराहने आयसीएसीच्या नव्याने जाहीर झालेल्या पुरुषांच्या कसोटी गोलंदाजांच्या क्रमवारीत पहिल्या क्रमांकाच्या गोलंदाजाचे स्थान मिळवले आहे.

बुमराह २०२२मध्ये पाठीच्या

## टीकाकारांना चपराक



फ्रॅक्चरमुळे बुमराहला मोठा ब्रेक घ्यावा लागला होता. या दुखापतीमुळे बुमराह २०२२ आशिया चषक आणि ऑस्ट्रेलियात टी-२० विश्वचषकातूनही बाहेर पडला होता. क्रिकेटपासून ११ महिने दूर राहिल्यानंतर बुमराह आयर्लंड मालिकेसाठी भारतीय संघात परतला होता. २०२३मध्ये बुमराह भारताच्या आशिया चषकाच्या संघाचासुद्धा भाग होता. गेल्या वर्षी आयसीसी विश्वचषक स्पर्धेत मोहम्मद शमीसह बुमराहने भारतीय गोलंदाजीची बाजू भक्कम केली होती.

दरम्यान, इंग्लंडविरुद्ध कसोटी मालिकेसाठी भारताचा उपकर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या बुमराहने विशाखापट्टणममध्ये रिव्हर्स स्विंगच्या बळावर इंग्लंडच्या संघाला पराभवाकडे ढकलले. नऊ विकेट्स मिळवून विझाग येथे झालेल्या दुसऱ्या कसोटीत भारताने इंग्लंडचा १०६ धावांनी पराभव केला. यासाठी बुमराहला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले. भारताच्या शानदार विजयानंतर, बुमराहने अनुभवी फिरकीपटू रविचंद्रन अश्विनच्या जागी पहिल्या क्रमांकाचा कसोटी गोलंदाज म्हणून स्थान मिळवले आहे.

कसोटी क्रमवारीत अव्वल स्थान मिळवण्याची ही सुवर्ण कामगिरी केल्यावर बुमराहने सर्व टीकाकारांना एकाच पोस्टमधून सडेतोड उत्तर दिले आहे. 'पाठिंबा देणारे विरुद्ध अभिनंदन करणारे' यामधील फरक दाखवणारी बुमराहची पोस्ट सोशल मीडियावर आता चर्चेत आली आहे. जेव्हा एखादा खेळाडू किंवा एखादी व्यक्ती तिच्या कामात मेहनत घेत असते तेव्हा तिला सतत पाठिंबा देणाऱ्यांमध्ये एखादाच चेहरा असतो, पण जेव्हा त्या मेहनतीचे फळ मिळते तेव्हा त्याचा आनंद साजरा करायला लोक गर्दी करतात, असा विरोधाभास दाखवत बुमराहने टीकाकारांना टोलवले आहे.

आयसीसीच्या गोलंदाजीत अव्वल स्थान मिळवणारा बुमराह हा चौथा भारतीय खेळाडू ठरला आहे. अश्विन, रवींद्र जडेजा आणि बिशनसिंग बेदी यांनी यापूर्वी अशीच कामगिरी केली होती.

# जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत आंबेवाडी, नवनाथ, आकांक्षा संघ दुसऱ्या फेरीत

**मुंबई : प्रतिनिधी**

आंबेवाडी मंडळ, नवनाथ क्रीडा, आकांक्षा मंडळ यांनी चारचौघी मित्र मंडळाने आयोजित केलेल्या पुरुष द्वितीय श्रेणी जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. ना. म. जोशी मार्ग येथील श्रमिक जिमखाना येथे ही स्पर्धा सुरू आहे.



पुरुष द्वितीय श्रेणी कबड्डी स्पर्धेच्या चुरशीच्या सामन्यात आंबेवाडी क्रीडा मंडळाने संस्कृती प्रतिष्ठानला ३२-२९असे नमविले. विश्रांतीला १९-१३ अशी आघाडी घेणाऱ्या आंबेवाडीला नंतर मात्र संस्कृतीने शर्थीची झुंज दिली. धनंजय निजामपूरकर, हिमांशू राऊत आंबेवाडीकडून, तर दर्शन एल्गार, साई गुप्ता संस्कृतीकडून उत्कृष्ट खेळले.

दुसऱ्या सामन्यात नवनाथ क्रीडा मंडळाने ओम् श्रीसाईनाथ सेवा ट्रस्टला २८-२१ असे चालविले. पहिल्या सत्रात १४-०७ अशी आश्वासक आघाडी घेणाऱ्या नवनाथला दुसऱ्या सत्रात श्री साईनाथने चांगलेच जेरीस आणले, पण वेळेचे गणित हुकल्याने त्यांना पराभव पत्करावा लागला. अभिषेक नलावडे, सिद्धेश कदम नवनाथच्या विजयाचे शिल्पकार ठरले. साईनाथच्या अनिकेत सावंत, सूरज आगटे यांनी दुसऱ्या सत्रात आपला खेळ गतिमान करीत सामन्यात रंगत आणली.


शेवटच्या सामन्यात आकांक्षा क्रीडा मंडळाने दादोजी कोंडदेव स्पोर्टस्‌ला ४०-३३ असे नमविले. अफताब पठाण, उत्कर्ष पेयर आकांक्षाकडून, तर प्रभात पाटील, अमर कदम दादोजी कोंडदेवकडून उत्तम खेळले.

# आंतर महाविद्यालयीन कॅरम व बुद्धिबळ स्पर्धेचा शुभारंभ

**कर्जत : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठाच्या ए झोन आंतर महाविद्यालयीन कॅरम व बुद्धिबळ स्पर्धांचा शुभारंभ कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयात करण्यात आला. यामध्ये कोकण ए झोनमधील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

रायगड जिल्हा कॅरम संघटनेचे खजिनदार वैभव पेठे यांच्या हस्ते कॅरम व बुद्धिबळ स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन समारंभास प्राचार्य डॉ. मोहन काळे, कर्जत तालुका बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष संजीव ठाकरे, राष्ट्रीय पंच अंकित जोशी, मुख्य पंच राजेश भुतकर, पंच चैतन्य मोहिते, ओमकार जिनघरे, प्रा. मनिषा चौधरी उपस्थित होत्या. डॉ. काळे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविकात, आमच्या महाविद्यालयाने



यापूर्वीही अशा प्रकारच्या स्पर्धा आयोजित केल्या होत्या. आमचे विद्यार्थी विविध ठिकाणी होत असलेल्या स्पर्धेमध्ये भाग घेऊन यशस्वी होत असतात, असे सांगितले.

वैभव पेठे यांनी, मुलांनी स्पर्धांमध्ये भाग घेणे अपेक्षित आहे. नुसतेच पुस्तकी ज्ञान घेऊन उपयोग नाही. विविध खेळांमध्ये भाग घेतल्यास एक वेगळा आनंद मिळतो व सर्व ताण तणावांपासून आपण बाजूला होतो, असे सूचित केले. अंकित जोशी यांनी, बुद्धिबळ खेळण्यासाठी हल्ली मुले पुढे येत नाहीत. खरेतर बुद्धिबळ खेळणाऱ्या मुलांची एकाग्रता चांगली असते. शाळांमधून बुद्धिबळ खेळण्यासाठी मुलांना प्रोत्साहित करणे आवश्यक आहे, अशी अपेक्षा व्यक्त केली. राजेश भुतकर यांनी, कॅरम या खेळामुळे मैत्री वाढत जाते. एखाद्या स्पर्धेत जिंकण्याच्या इराद्याने नक्की जा, पण स्पर्धेत सहभागी व्हा, असा सल्ला दिला. सूत्रसंचालन प्रा. प्रणिता भांगरे यांनी केले.

या वेळी किशोर कुरूळकर, रूपाली ठाकरे, दिप्ती हुरगत, नैना बदले, रोहन पाटील, चेतना वाघ, डॉ.निलोफर खान, डॉ.रूपाली येवले, प्रदीपकुमार वाहुले, सतीश पांडव, मालोजी रनावरे, स्वप्नील फा, वनिता कणसे, प्रिय खापे, भाग्यश्री सूर्यवंशी, श्वेता दांगट आदी उपस्थित होते.

# हॉकीपटू वरुण कुमारवर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय हॉकीपटू वरुण कुमारवर एका महिलेने लग्नाचे आमिष दाखवून अनेकवेळा बलात्कार केल्याचा आरोप केला आहे. वरुणवर पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरुण हा ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या संघाचा सदस्य राहिला आहे. पीडित महिला सध्या विमान कंपनीत कर्मचारी म्हणून काम करते.

महिलेने एफआयआरमध्ये दावा केला आहे की, ती १७ वर्षांची असताना २०१८मध्ये अर्जुन पुरस्कार विजेते वरुण कुमारच्या संपर्कात आली. त्या वेळी वरुण बंगळुरू येथील स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडियामध्ये प्रशिक्षण घेत होता. वरुण कुमारने तिच्याशी इन्स्टाग्रामद्वारे संपर्क साधला आणि भेटण्याचा आग्रह धरला, पण तिने प्रतिसाद दिला नाही. मित्रांमुळे अखेर ती त्याला भेटली. नंतर ते मित्र झाले आणि नातेसंबंधात आले.

# विराट कोहली पुढील दोन कसोटी सामन्यांनाही मुकणार?

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा तारांकित फलंदाज विराट कोहली वैयक्तिक कारणास्तव इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या आणि चौथ्या कसोटी सामन्याला मुकण्याची शक्यता आहे तसेच अखेरच्या कसोटी सामन्यासाठी त्याच्या उपलब्धतेबाबतही साशंकता आहे, असे भारतीय क्रिकेट नियामक मंडळातील (बीसीसीआय) सूत्रांकडून सांगण्यात आले.

भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांची कसोटी मालिका सध्या १-१ अशी बरोबरीत आहे. या मालिकेचा तिसरा सामना राजकोट येथे १५ ते १९ फेब्रुवारी या कालावधीत, तर चौथा सामना रांची येथे २३ ते २७ फेब्रुवारीदरम्यान खेळवला जाणार आहे. वैयक्तिक कारणास्तव विराट कोहली पहिल्या दोन कसोटी सामन्यांनाही मुकला




होता. विराटचा जवळचा मित्र आणि दक्षिण आफ्रिकेचा माजी कर्णधार एबी डिव्हिलियर्सने नुकतेच आपल्या यूट्युब चॅनलवर विराट आपल्या दुसऱ्या पाल्याच्या प्रतीक्षेत असल्याचे म्हटले होते. क्रिकेटपटूंच्या कुटुंबाचा प्रश्न असतो, तेव्हा बीसीसीआय ठामपणे त्यांच्या पाठीशी उभे असते. आता भारतीय संघात पुनरागमन कधी करायचे याबाबतचा निर्णय विराटच घेईल. सध्या तरी तो या मालिकेत खेळेल असे वाटत नाही, असे बीसीसीआयच्या सूत्रांकडून सांगण्यात आले.

# अभिजित कुंटे यांना 'फिडे'चा पुरस्कार

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचे माजी आंतरराष्ट्रीय नामवंत बुद्धिबळ खेळाडू, प्रशिक्षक ग्रँडमास्टर अभिजीत कुंटे यांची आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघाने (फिडे) १५व्या फिडे ट्रेनर पुरस्कारासाठी निवड केली आहे. जागतिक बुद्धिबळ खेळात खासकरून त्यांनी दिलेल्या प्रशिक्षणाची आणि योगदानाची दखल घेऊन फिडेने या पुरस्कारासाठी त्यांची निवड केली आहे. त्यांना प्रतिष्ठीत वख्तांग कारसेलाडझे पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

अभिजित कुंटे इंडियन ऑइलमध्ये उच्च पदावर कार्यरत आहेत. भारतीय संघाचे न खेळणारे कर्णधार असलेल्या आणि प्रशिक्षक या नात्याने भारतीय महिला बुद्धिबळ संघाला भरीव यश मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका कुंटे यांनी बजावली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय महिला संघाने २०२१च्या जागतिक स्पर्धेत आणि २०२२च्या आशियाई



क्रीडा स्पर्धेत रौप्यपदकाची कमाई केली तसेच ४४व्या चेस ऑलिम्पियाडमध्ये भारतीय महिला संघाने कांस्यपदक मिळवले होते. भारतीय महिला संघाने या तिनही स्पर्धेत पहिल्यांदाच पदके जिंकून नवा इतिहास भारतीय महिला बुद्धिबळामध्ये रचला. भारतीय महिला संघाला एवढे मोठे यश मिळवून देणारे कुंटे हे चौथे ग्रँडमास्टर आहेत. भारतीय महिला संघाच्या यशात त्यांचे प्रेरणात्मक आणि धोरणात्मक मार्गदर्शन निश्चितपणे यशस्वी ठरले. २०२२मध्ये आशियाई बुद्धिबळ महासंघाने त्यांना वर्षातील सर्वोत्तम प्रशिक्षक म्हणून गौरविले होते. आता 'फिडे'च्या ट्रेनर पुरस्कारामुळे त्यांच्या बुद्धिबळ कारकीर्दीत आणखी मोठी भर पडली आहे. 'फिडे'च्या ट्रेनर पुरस्कार निवड समितीमध्ये लिएम (व्हिएतनाम), अकोपियन (अमेरिका), अमिन (इजिप्त), मारीन (रुमानिया) या दिग्गज प्रशिक्षकांचा समावेश होता.

## राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा

# सांगली, पुण्याचे दोन्ही संघ अंतिम फेरीत

**सांगली : प्रतिनिधी**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालयाच्या मान्यतेने सांगली येथे सुरू असलेल्या कै. भाई नेरूरकर चषक राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेच्या अंतिम फेरीत किशोरी गटात धाराशिव वि. सांगली व किशोर गटात सांगली वि. ठाणे; तर महिला गटात पुणे वि. धाराशिव व पुरुष गटात मुंबई उपनगर वि. पुणे विजेतेपदासाठी लढतील.

कुपवाड येथे सुरू असलेल्या स्पर्धेत उपांत्य फेरीमध्ये किशोरी गटात धाराशिवने कोल्हापूरवर (१०-९) दोन मिनिटे ३० सेकंद राखून एक गुणाने विजय मिळवला. किशोरींच्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात सांगलीने सोलापूरचा (९-४) एक डाव राखून पाच गुणांनी पराभव केला.

किशोर गटात सांगलीने पुण्याचा (१३-१२) अर्धा मि. राखून एक गुणाने पराभव केला. चुरशीच्या झालेल्या सामन्यात किशोरांच्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात ठाण्याने साताऱ्याचा (९-६) एक डाव तीन गुणांनी पराभव केला.

महिला गटात पुण्याने सांगलीवर (१८-८) १० गुणांनी मात केली. महिलांच्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात धाराशिवने कोल्हापूरला (१५-१०) पाच गुणांनी हरवत अंतिम फेरी गाठली.

पुरुष गटात पहिल्या उपांत्य सामन्यात पुण्याने सांगलीवर (१३-१२) एक डाव एक गुणाने सहज मात केली. मुंबई उपनगर विरुद्ध ठाणे या दुसऱ्या उपांत्य सामना अटीतटीचा झाला. जादा डावापर्यंत रंगलेल्या सामन्यात मुंबई उपनगरने (२७-२६) एक गुण व एक मिनिट राखून विजय मिळवला.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com